नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

मूल्य १ रुपया

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
ग्रंथ संपदा

प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे, संमेलनाध्यक्ष
२६ वे विदर्भ साहित्य संमेलन, काटोल

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या अंकात

१. सूक्तिधन : अ. ना. दे.

२. अभिजात संगीताची परंपरा
आणि घराणी : डॉ. बाळ पुरोहित

३. उ. रा. गिरी यांची कविता
वामन इंगळे

४. काही कविता : उ. रा. गिरी

५. अ. ना. दे. : एक व्यक्तिमत्व :
श्री. सी. ता. पुराणिक

६. आवड-निवड : ए. सा. वा.

७. स्वभाव–वैशिष्ठ्य र. द. सरंजामे

८. पुस्तक–परीक्षणे :
१ पुन्हा कविता;
२ अजगर (कादंबरी);
३ झाकोळ (कादंबरी)

९. चित्ररसोत्पत्ती आणि चित्ररसास्वादन :
घनंजय नाकाडे

१०. 'देशपांडे सर' श्री. प्रभाकर चांदेकर

याशिवाय संपादकीय, पत्रव्यवहार,
संघवार्ता वगैरे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

यु ग वा णी

संपादक
मा. नी. गलगलीकर

संपादक मंडळ

श्री. बाळासाहेब दवले | श्री. वसंत वऱ्हाडपांडे
सा. भू. तु. ना. काटकर | श्री. श्रीकान्त राय
श्री. व्यं. नी. पंडित | प्रा. पुंडरीक धुमाळे

वर्ष २१] मे १९६६ [अंक १

सू क्ति—ध न

व्यक्तिगत अनुभूतींचा शब्दरूप आविष्कार, ही वाङमयाची व्याख्या सर्वमान्य होण्यासारखी आहे; पण विशिष्ट वाङमयीन कृतीची योग्यता ठरविताना त्यातील अनुभूतीचा प्रामाणिकपणा जसा जोखला पाहिजे; ही अनुभूति आणि तिची अभिव्यक्ति यात संवाद आहे किंवा नाही हे जसे तपासून पाहिले पाहिजे, त्याचबरोबर त्या अनुभूतीत प्रकट झालेल्या निर्मात्याच्या व्यक्तिमत्वाचीही प्रत लावली पाहिजे. ही व्यक्तिमत्वाची प्रतवारी सामाजिक मूल्यांनीच लावणे शक्य आहे. सामाजिकता ही जशी त्या निर्मात्याच्या व्यक्तिमत्वाचा एक स्वाभाविक व अंगभूत असा घटक आहे, त्याप्रमाणे सामाजिकता हा वाङमयाच्या रसिक मनावर होणाऱ्या परिणामाचाही एक अटळ अंश आहे. तेव्हा वाङमयसमीक्षेत सामाजिकतेचे मूल्य टाळणे वा त्याला गौण लेखणे म्हणजे वाङमयनिर्मिति व वाङमयास्वाद या प्रक्रियांच्या खऱ्या स्वरूपाविषयी अज्ञान प्रकट करण्यासारखे आहे.

—अ. ना. दे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अभिजात संगीताची परंपरा आणि घराणी

डॉ. बाळ पुरोहित

१. घराण्याच्या कल्पनेचा इतिहास

कोणत्याही विद्येचा किंवा कलेचा इतिहास पाहिला तर परंपरेचे महत्त्व इतर देशांपेक्षा आपल्या देशात अधिक प्रमाणात आचारलेले अथवा मानलेले दिसते. आमच्या परंपरेचे मूळ, मग ते वैद्यक, संगीत, ज्योतिष अगर अन्य भारतीय विद्येचे असो, ते प्रत्यक्ष ब्रह्मदेवापासून असल्याचा उल्लेख सापडतो. वेद म्हणजे भारतीयांचे ज्ञानभांडार. ह्या विद्यांची परंपरा कोठूनही असली तरी ती वेदांगे असल्यामुळे अनादी आहेत, अनंत आहेत, अपरंपार आहेत. भारतीय संगीताची गंगोत्री सामवेदात आहे असे म्हणतात आणि तेव्हापासून भारतीय संगीताची परंपरा ही अव्याहत चालू आहे.

भारतीय संगीताची परंपरा जरी पुरातन कालापासून अव्याहत चालू असली तरी भारतीय संगीतात घराण्याचा उदय नक्की केव्हा झाला हे सांगणे कठिण आहे. पण घराण्याची कल्पना फार जुनी नसावी. कारण आपल्या संगीतावरील प्राचीन वाङ्मयात घराण्याचा उल्लेख नाही. सातत्याने चालत आलेल्या घराण्यांचे उल्लेख त्यात आढळून येत नाहीत. त्यामुळे घराण्याच्या कल्पनेचा इतिहास फार प्राचीन असेल असे वाटत नाही. प्राचीनकाळी सामगान प्रचलित होते. नंतर छंदवृत्तांचे जातिगायन अस्तित्वात आले. पण त्यात घराण्याच्या कल्पनेचा कुठेही उल्लेख सापडत नाही. रागगायन प्रचारात येईपर्यंत तरी घराण्याची कल्पना अस्तित्वात नसावी.

तेराव्या शतकात भारतावर मुसलमानांचे आक्रमण सुरू झाले आणि त्यांनी येथे कायमचा तळ ठोकला. त्यामुळे पर्शियन संगीताचा भारतीय संगीताशी संघर्ष होऊन आपली उत्तर हिंदुस्थानी संगीत-पद्धती अस्तित्वात आली. आणि याच वेळेपासून उत्तर व दक्षिण अशा दोन वेगळ्या संगीतपद्धती दिसून येऊ लागल्या. ह्या कालखंडात मोगल येथे कायमचे स्थायिक बनले. त्यांनी येथल्या कितीतरी गोष्टी आपल्या मानल्या, आपल्याशा केल्या आणि त्यांनी येथील संगीत आत्मसात केले. त्यात त्यांनी स्वतःची भरही घातली. ह्या भरीत त्यांनी बाहेरून काही फारसे आणले असे वाटत नाही. पण जे काही त्यांनी स्वतःचे म्हणून संगीतात दाखल केले तिचेच अवशेष आपल्याला आज घराण्याच्या परंपरेत जपून ठेवलेले दिसून येतात.

आपण ज्याला घरंदाज गायकी किंवा अभिजात संगीत म्हणतो त्याला घराण्याच्या भाषेत उस्तादी संगीत असेही म्हटले जाते. अभिजात संगीतात आदत, जिगर, हिसाब शब्दांचा वापर होऊ लागल्यावरून घराणे ही संस्था मोगल सत्तेत उदयाला आली आहे असे वाटते. हल्ली अभिजात संगीत किंवा उस्तादी संगीत अथवा घरंदाज गायकी हा शब्दप्रयोग रागदारी संगीतापुरताच केला जातो. ठुमऱ्यांची घराणी, नाट्य-संगीताची घराणी असे शब्दप्रयोग कधी ऐकल्याचे किंवा वाचल्याचे स्मरत नाही. रागगायन प्रचारात आल्यानंतर धृपदाचेच गायन प्रचलित होते. भानु, लोहग, डालु, भगवान, गोपाळदास, बैजु, पांडे, चर्जू, बक्सु, धोंडु, मीरांभवनायक इत्यादि प्राचीन गायक धृपदेच गात असत. धृपद गायनाचा प्रचार अकबराचे कारकीर्दीत विशेषत्वेकरून होता. अकबराच्या कार-कीर्दीत चार प्रसिद्ध गुणी जन होते. तानसेन, ब्रिजचंद,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राजा समोखनसिंग आणि श्रीचंद ही त्यांची नावे आहेत. ह्यांपैकी तानसेन व समोखनसिंग यांच्या परंपरेचा इतिहास मिळतो. त्याकाळी धृपद गायनाचे वेळी घराण्याच्या ऐवजी वाण्या प्रचलित होत्या. तानसेनाची वाणी गौडी होती. वाकीचे तिघे अनुक्रमे डागुरी, खंडारी व नौहारी या नावाने ओळखले जात होते. खंडारी वाणीतील समोखनसिंग हा वीनकार होता. तो पुढे मुसलमान झाला व नंतर तानसेनाचा जावई झाला आणि त्याचेच घराणे आजतागायत आढळून येते. म्हणजे धृपद गायनशैलीपासूनच घराण्याच्या कल्पनेचा उदय झाला. धृपद गायनानंतर ख्यालगायन प्रचारात आले, तसेच वाण्याची कल्पना जाऊन घराण्याची कल्पना रूढ झाली. ख्याल गायनाच्या बाबतीत इतिहास मिळतो तो असा. तेराव्या शतकातील अमीर खुश्रोने रचलेला ख्याल—गायनाचा नवीन प्रकार त्याच्या पुढील प्रत्येक पिढीने जतन केला होता. आणि दिल्लीच्या दरबारात (महंमदशहा रंगीले) सदारंग अदारंग यांच्या प्रयत्नाने ख्यालगायन सरकारी रीत्या मान्य पावले. पुढे पुढे धृपद गायन जाऊन ख्याल गायनाचाच प्रकार अधिक रूढ झाला व आज धृपदगायन नाममात्र शिल्लक आहे.

सरंजामशाहीत म्हणजे ब्रिटिशांच्या कारकीर्दीत राजदरबारातील संगीताचे महत्व काढून टाकले. साहजिकच ह्या पोरक्या झालेल्या संगीतकलेला संस्थानिकांनी आश्रय दिला. आणि त्यामुळेच आज संगीतकला जिवंत राहिली असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही. पण याच कालात घराण्यांचा विस्तार बेसुमार झाला. अनेक घराणी निर्माण झाली. जो तो आपआपल्या घराण्याची थोरवी गाऊ लागला. हे घरंदाज समजणारे गवई आपल्या कलेविषयी गर्विष्ठ बनले. आपल्या संकुचित मनोवृत्तीमुळे जतन करून ठेवलेल्या विद्येचे दान करण्यास अळम् टळम् करू लागले. गवई विद्याचोर बनला. फक्त आपल्या पुत्रास वा पट्टशिष्यास शिकवीत व ताकीतही देऊन ठेवीत की "बेटा, इस संगीतको जो हमने तुम्हें प्रदान किया है, उसे अपनेही पास रखना, इसे दूसरे को न देना" हेच वेदवाक्य समजून बहुतेक घराण्याचे वंशज व शिष्यसंप्रदाय याचे पालन करीत आले. आपली कला आपलेपाशीच जतन केली म्हणजे आपली प्रतिष्ठा वाढेल ह्या खोट या प्रतिष्ठेपायी स्वार्थाने ते गर्विष्ठ बनले व संगीतकलेचे दुर्दैव म्हणूनच की काय अशा घराण्याचे वंशज अजून टिकून आहेत. नुसत्या ऐकून चिजा उडविणारे गवई किंवा स्वयंमन्य संगीताचार्य "अपने अपने तानमे चिडिया है कप्तान" असा देखावा होता. अशा प्रकारचे चित्र श्री. उमेश जोशी यांनी आपल्या "भारतीय संगीतका इतिहास" या ग्रंथात केले आहे. ह्याविषयीचे दाखले कै. चतुर पंडितांच्या ग्रंथात देखील दिलेले आढळतात. म्हणजे घराण्याचा प्रपंच आज उणी पुरी दोन अडीचशे वर्षे चालला आहे. पण विशेषत: सरंजामशाहीत ख्याल गायकीची अनेक घराणी निर्माण झाली आणि ही सर्व घराणी बहुतेक ग्वाल्हेर गायकीतूनच निर्माण झाली. कारण अकबर बादशहाचे वेळेपासून ग्वाल्हेर हे संगीतकलेचे माहेरघर होते. ग्वाल्हेरहूनच बहुतेक गायक पोटाच्या सोयीसाठी वेगवेगळ्या संस्थानच्या दरबारात नोकरीला राहिले आणि या त्यांच्या संस्थानाच्या नावावरूनच घराण्याची नावे पडली आहेत. ग्वाल्हेर, जयपूर, कोल्हापूर, इंदोर, बडोदे इत्यादी.

ह्या घराण्याच्या एकंदर इतिहासावरूनच घराणे कसे व का उत्पन्न होते याचा विचार करावा लागेल. कारण हिंदुस्थानी संगीत पद्धतीत घराण्याला फार वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. ह्या घराण्याच्या कल्पनेने अनेक लहान गायकवादकांना गौरव प्राप्त झाला आहे. मोठ्या गायकवादकांच्या प्रतिष्ठेत भर पडली आहे, काहींना पछाडले आहे तर कित्येकांची अवहेलना झाली आहे. अनेकांमध्ये कलह माजलेले आहेत. तरी देखील घराण्याची कल्पना अजून टिकून आहे. असे हे घराणे म्हणजे आहे तरी काय ?

२. घराणे का व कसे उत्पन्न होते ?

संगीत ही अत्यंत क्षणजीवी कला आहे. तिच्या उत्पत्तीचा क्षण हाच तिच्या नाशाचा क्षण. आपण एखाद्याचे गाणे ऐकतो तेव्हा त्या गाण्याचा प्रत्येक स्वर हा प्रतिक्षणाला भूतकालात जमा होत असतो. आपल्या मनावर जो त्या गायनाचा परिणाम होतो तो केवळ स्मृतिरूप असतो. ते गाणे चांगले झाले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असेल तर ती सुखदायक आठवण व चांगले झाले नसल्यास असुखदायक आठवण असते. एकूण नुसती आठवणच. ते गायन ध्वनिमुद्रित केले तरी ते गाण्याचे छायाचित्रच आणि छायाचित्रात नुसती मूळ आठवणीची कल्पना देण्याइतकेच त्याचे सामर्थ्य असते. प्रत्येक स्वर हा त्याच क्षणी भूतकालाकडे चाललेला असतो. गायनकला ही आपल्या स्वरलहरीने सतत बेचैन करून सोडणारी कला आहे. नाद हे तिचे उपादान आहे आणि या नादाचे अनेक प्रकारचे आकार हे तिचे मर्म आहे. स्वरांची एखादी अद्वितीय लहर श्रोत्यांच्या मनावर परिणाम करते आणि गायनकलेचा हा वारसा सतत जपून ठेवण्याच्या इच्छेमधून घराण्याची कल्पना उदय पावली असावी. गायकाने एखादा राग निर्माण केला तर त्याचा वारसा कसा जपून ठेवायचा ? तर तंतोतंत त्याच्यासारखे गाऊन. गायकाने एखादी चीज बांधली तर तिचा वारसा कसा जपून ठेवायचा ? त्याची तंतोतंत नक्कल करून. आणि यासाठीच एका वेळी एक गुरू व एक शिष्य ही प्रथा पडण्याचे प्रयोजन असावे. अशा गुरुपरंपरेमुळेच आजतागायत गायनकला चालत आलेली आहे हे विसरून चालणार नाही. स्वरांचे संगोपन, संवर्धन करून, त्यावर वेगवेगळे अलंकार चढवून तयार केलेला आपला आवाज (गळा), गुरू आपल्या शिष्याच्या गळयात उतरविण्याचा वर्षानुवर्षे प्रयत्न करतो. संगीताच्या भाषेत यालाच तालीम असे म्हटले आहे. ह्या क्रियेमुळेच संगीतकलेची देवघेव करता येते. स्वर लावण्याची पद्धत व गायकीचे वेगवेगळे कायदे शिष्याच्या गळयात सालंकृत उतरविले जातात आणि या गुरुशिष्यपरंपरेतच संगीतकलेला जे सातत्य लाभते त्यात घराण्याचा उगम होतो.

अभिजात संगीतातच घराण्याचे महत्व का ?

आवाज हा एक शरीराचा धर्म आहे. यामुळे जितक्या व्यक्ती तितके आवाज आणि त्यामुळे प्रत्येक व्यक्तीचा आवाज म्हणजे एक स्वतंत्र रूप आहे. एकासारखा तंतोतंत आवाज सापडणे अत्यंत कठीण. प्रत्येक आवाजाचा रंग वेगळा, धर्म वेगळा, त्यावर चढविण्यासारखे, शोभण्यासारखे अलंकार भिन्न आणि त्याचा परिणामही निरनिराळा. अशा ह्या भिन्न प्रकृतीच्या, भिन्न स्वभावाच्या आवाजात गुरूने आपली कला उतरविणे अत्यंत परिश्रमाचे आहे व या क्रियेसाठी वर्षानुवर्षे लागतात. गुरूच्या स्वराशी स्वर मिळवताना कित्येक वेळी प्रगल्भ झालेला विद्यार्थी देखील घायकुतीला येतो. मग त्याची री ओढणे तर दूरच. यासाठीच शिष्याच्या आवाजात गुरूच्या वृत्तीची व गुरूच्या आवाजातील गुणधर्मांची स्थापना करण्याची क्रिया वर्षानुवर्ष करावी लागते. म्हणून इतर कुठल्याही कलेपेक्षा किंवा शास्त्रापेक्षा संगीतातच गुरुशिष्याचे संबंध जास्त निकटवर्ती असतात. अभिजात संगीतात आवाज बनविण्यासाठी वर्षानुवर्षे त्यावर संस्कार करावे लागतात. रियाझ–मेहनत करून घ्यावी लागते. संस्कारित आवाज हाच अभिजात संगीतात ग्राह्य असून असंस्कारित आवाजाला घरंदाज गायकीत स्थान नाही. कारण संस्कार करूनच आवाज सुरेल बनवावयाचा असतो. आणि नित्य मेहेनतीनेच तो सुरेल व स्थिर बनतो. याचमुळे आवाज हुकुमी लावता येतो. रियाझीमुळे आवाज वजनदार होतो. आवाजात एक प्रकारची घनता किंवा वजन, कस निर्माण होतो. आवाजातील वजनामुळेच गायन प्रभावी व परिणामकारक होते, एरवी नाही. एकूण आवाज सुरात लावता येणे, तो हव्या त्या स्वरावर स्थिर ठेवता येणे, त्यातील वरचे खालचे कण स्वेच्छेने व हुकुमी लावता येणे, आवाजात वजन आणणे ह्या गोष्टी आवाजावर घेतलेल्या मेहनतीनेच शक्य होतात. ही सर्व क्रिया गुरूच्या मार्गदर्शनाखाली होत असते आणि याच गोष्टीमुळे अभिजात संगीतात घराण्याचे महत्व प्राबल्याने दिसून येते. म्हणूनच अभिजात संगीतात गुरूसारखे सही सही गाणे, गंडाबंद शागिर्दी, अशासारख्या गोष्टींना पुष्कळ महत्त्व आहे. वाजवीपेक्षाही जास्त महत्त्व आले आहे. हिंदुस्थानी संगीतपद्धतीत घराण्याचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे, याचे कारणही हेच. इतर कोणत्याही कलेत किंवा शास्त्रात नाही, इतके महत्त्व घराण्याला संगीतात आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उ. रा. गिरी यांची कविता

वामन इंगळे

श्रेष्ठ कवितेचे वैशिष्टच असे की ती पुष्कळदा एखाद्या व्युत्पन्न टीकाकाराला एकाच कारणासाठी मोठी वाटत असली तरी तिच्यात त्याचवेळी श्रेष्ठतेची इतरही परिमाणे जिवंतपणे हजर असू शकतात. तिच्यातून व्यक्त झालेला अनुभव हा आत्मलक्ष्यी ढंगाचा असला तरीही तो त्यावेळी विश्वात्मकही बनत असतो. 'Singular judgements are universal judgements'

तो एका अर्थाने मुळात जाऊन मानवी संस्कृतीची खोटी आवरणे विनदिक्कतपणे झुगारून देऊ शकतो. (पण याचा व्यत्यास खरा असेलच असे नाही.) आणि तरीही त्या अनुभवाला असामाजिक वगैरे तर म्हणता येतच नाही. पण तो मानवी संस्कृतीच्या गूढावर प्रकाश टाकणाऱ्या दार्शनिकतेचा टिळा स्वतःच्या भाळी धारण करू शकतो. 'तू एक मुंगी' अथवा 'पोट नट दावी किती नाना कळा' सारख्या कवितातून ही क्रिया अर्थांतरन्यासातील ठोकळपणा टाकून समर्थपणे घडलेली आहे असे दिसून येते.

त्या कवितेत सामाजिक जाणीव असेल तर ती इतकी प्रखर होऊन येते की भविष्यात समाजसंदर्भ बदलला (आणि तो बदलतोच) तरीही ती कविता शुद्ध इतिहासकालीन बनत नाही.

उ. रा. गिरी हे एक श्रेष्ठ कवि आहेत असे विधान सरसकटपणे आजच करता आले नाही, तरी त्यांच्या कवितेचे स्वरूप सर्वच टीकापद्धतींना रुचू शकेल असे आहे, आणि असे म्हणताना त्यांच्या कविपिंडात काही विसंगती आहे असेही दाखऊन देता येणार नाही. कारण (श्रेष्ठींचे उदाहरण घेतल्यास) तशी विसंगती साम्यवाद हे अपरिहार्य ध्येय मानणाऱ्या पॅस्टरनॅकच्या कवितातही शोधता येऊ शकत नाही. (आता तर खुद्द ख्रुश्चोव्हलाही ती विसंगती शोधल्याचे वाईट वाटले असे म्हणतात.)

डोळ्यासमोर समाजातील प्रश्न जळत असताना ही कलावंत मंडळी प्रेम आणि इतर भलत्याच गोष्टींवर लिहीत बसतात हा लोकप्रिय आरोप गिरींच्याही कवितेच्या संदर्भात होण्यासारखा आहे. गिरींच्या किंवा याच प्रकृतीच्या कलावंताच्या तशा बचावाची गरज नाही. हे कलावंत पलायनवादी असतात की काय याचाही विचार करण्याची फारशी गरज नाही. तरीपण कलाकृतीसंबंधी कलेच्याच संदर्भात जे प्रश्न निर्माण होतात त्याचा विचार होणे आवश्यक आहे.

शक्याशक्यता नजरेआड करून, उद्या पृथ्वीवर वर्गहीन आणि राज्यविहीन हे समाजवादी वा सर्वोदयी स्वप्न साकार झाले असे गृहीत धरले तर माझ्या मनात एक प्रश्न उभा राहतो. त्यावेळी मर्ढेकर, मुक्तिबोध, करंदीकर आपल्या कवितांतून कोणता (श्रेष्ठींचीच उदाहरणे घेणे इष्ट म्हणून) अनुभव व्यक्त करतील ? आज व्यक्त होणाऱ्या आशयरूपाचे त्या कवितेशी एखादे सामाजिक नाते प्रस्थापित करता येईल काय ? तसे करता आले तर त्या कविता आजच्या मर्यादित अर्थाने सामाजिक जाणिवांच्या कविता ठरतील काय ?

किंवहुना आजच 'मृद्‌गंध' आणि 'तालचित्रे' यांच्यात एखादे सरधोपट आणि सामाजिक नाते शोधता येऊ शकते काय ? आणि असे शिस्तबद्ध नाते न

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सापडले, एवढ्याचसाठी आधीच्या विशिष्ट कवितेपेक्षा नंतरची विशिष्ट कविता अपयशी झाली असे म्हणता येऊ शकते काय ?

गिरींच्या कवितेच्या संदर्भात वरील प्रश्न मी एवढ्याचसाठी उभे करीत आहे की त्यांच्याही कवितेचे असे दोन गट पडतात आणि त्यापैकी रूढार्थाने सामाजिक जाणीव असलेला कविता गट, ती प्रखरपणे न आल्यामुळे, श्रेष्ठ कविता म्हणून नाव काढू शकेल किंवा नाही अशी मला शंका आहे.

केवळ सामाजिक जाणीव असणे हे जसे एखाद्या कवितेचे वलस्थान होऊ शकत नाही, तसेच तिचा केवळ अभाव असणाऱ्या कवितेचे तेवढ्यासाठीच अवमूल्यनही केल्या जाऊ शकत नाही. (इच्छा, स्मृती, कल्पना मृत्यूचे गूढ, निसर्ग, प्रणय इ. हे घटक जर सामाजिक जाणिवेत अंतर्भूत होऊ शकत असतील, तर प्रत्येकच कलावंत ही जाणीव ठेऊन असतो असे म्हणावे लागेल.)

सामाजिक जाणीव ही अपरिहार्य आहे. ती अपरिहार्य आहे असे म्हणण्यातही एक प्रकारची द्विरुक्ती आहे. पण असे असले तरी कवितेत द्राव्य होण्यापूर्वीची सामाजिक जाणीव ही कुठल्याही एका तपशीलासारखीच सामान्य तपशील म्हणून असते. आणि काव्यात द्राव्य झाल्यानंतर तिची इष्टानिष्टता, श्रेष्ठकनिष्ठता, सामाजिक तत्त्वज्ञानाच्या कसोटीवर सरवोपटपणे पाहता येणार नाही.

गिरींच्या 'वाढ माकरी' या आणि इतर कवितात ही जाणीव आहे. रूढार्थाची प्रगल्भ शब्दयोजना, प्रचलित संकेत हे सर्व तिच्यात आहे. पण तरी ती फार मोठी होऊ शकेल असे वाटत नाही. त्यांची जी निखालस भावकविता आहे तिचे मात्र तसे नाही. विशेषतः त्यांची 'सखि सैल कर गळ्यातिल करपाश रेशमाचे' ही कविता अभ्यासनीय आहे. या कवितेच्या बाबतीत मागे उल्लेख केला, तसे जर घडू शकले तर व्युत्पन्न टीकाकाराचा दृष्टिकोनही शेवटी 'कोन'च असतो आणि काव्यगत सत्य हे शेवटी जीवनाइतकेच व्यापक असते असे सिद्ध होऊ शकेल.

गिरींनी आपल्या काही कवितांतून निसर्गातील लय अचुक पकडली आहे. ती पकडताना काव्यकलेविषयी त्यांना जी सुप्तगुप्त समज आहे, ती सार्वकालिक वजनाची आहे असे दिसून येते.

सोनस्पर्शाच्या क्षणाची होऊनी मल्हारबाधा।
विश्वसारे हे सतारीसारखे झंकारलेले ।
रेललेली गात्रगंधा किमिजी तंद्रीत पृथ्वी ।
गूढ स्वप्नासारखे आकाश आहे भारलेले ॥

मात्र विशेषणांचा अघळपघळपणा या यशाचा तुरा हिसकून नेतो हा भाग वेगळा. प्रत्यक्षाकडून अप्रत्यक्षाकडे या क्रियेत प्रत्यक्ष हातात काय पडते याचा हिशेब मांडणे कठीण आहे.

त्यांचा 'चांफा' हा अभंगही लक्षणीय आहे.

'आशयाचा डोह
पान्हावली वाणी
न्हालो इंद्रायणी इंद्रियात'

त्यांची 'सृजन' ही कविता शब्दावरची हुकूमत त्यांच्या कार्यासकट प्रगट करते. तिच्यात प्रतिमेचे प्रतिमेशीच जे Dialectic घडते त्यातून ही कविता कोंभासारखी लसलसत बाहेर पडते.

अवरोध किती करशील जळा
ही येत हळु बाहेर कळी
पानात फुले उन्मेष निळा
देठात स्फुरे चैतन्य तळी

ही कविता म्हणजे विरोधविकासाचं एक अल्लड सजीविकरण आहे. हिच्यातून जे सामाजिक तपशील डोकावतात (ध्वनित होतात) ते मात्र एखाद्या निर्बल रूपकाप्रमाणे आहेत. पण ही कविता शुद्ध निसर्गातील अनुभवांवर आधारित आहे असे मानले तर निसर्गातील नवनिर्माण या क्रियेच्या नाडीचे ठोके ऐकल्याची इंद्रियसंवेदना मिळते, आणि ती फार प्रत्ययकारी आहे.

'प्रस्थान' ही त्यांची अशीच एक यशस्वी कविता आहे. हिच्यावर भारतीय सांप्रदायिक मृत्यू कल्पनेचे सावट असले तरीही 'पूस तुझे सखि लोचन ओले' या ओळी समर्थपणे संप्रदायाचा जाच बाजूला सारतात.

'याच किनाऱ्याकडे केधवा बुद्ध ख्रिस्त ज्ञानेश्वर गेले'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

—या कल्पनेत मृत्यूची भीती कमी करून सखीला अभयाचे आश्वासन आहे; त्यामुळे ही कविता एका वस्तुनिष्ठेच्या खांबावर उभी असल्यासारखी वाटते.

आणि 'कर सैल तू गळयातिल करपाश रेशमाचे' ही कविता म्हणजे गिरींच्या कवितातील एक मर्मबंधाची ठेव आहे. हिच्यात एक बहिर्मुख नाट्य असले तरीपण ती कवितेचा जिवंतपणा झाकाळून (Projection) टाकीत नाही. बाळबोध तरी पण ताज्या संकेतावर जगलेली ही कविता गिरींची खरी कमाई आहे.

'सखी रत्नदीप आता विझलेत वासनेचे.' रत्नदीप पण वासनेचे! (किंवहुना वासनेचे पण रत्नदीप!) या शब्दातील व्याघातांनी दोन दर्शनातील वैचारिक वजनांचा ताण लीलेने झेलला आहे. या ओळी (आणि संपूर्ण कविताच) शतकातून एकदाच लिहिणाऱ्या कवीच्या असाव्यात इतक्या ढळढळीत आणि सच्च्या आहेत.

गिरींचा पिंड शुद्ध भावकवीचा आहे. त्यांचे यश रेग्यांच्या कवितेइतके आज मोठे नाही. अथवा करंदीकरांच्या 'धृपद'चाही आवाका तिच्यात नाही. (मुक्तिबोध—मर्ढेकरांच्या कवितेशी तिची तुलना संभवत नाही.)

पण या 'नेति नेति'तच गिरींच्या अनुभवाची पृथगात्मता आहे. त्यांच्या कवितेवर कोणत्याही श्रेष्ठीचा वरदहस्त नाही त्यामुळे ती मूळ शुद्ध रूपात संगीन राहिली आहे.

कोणताही कलावंत हा स्वतःच्या अनुभवक्षेत्राचा पूर्ण नियंत्रक आणि मालक असतो. जळत्या सामाजिक जाणीवेला सामोरे गेलेच पाहिजे, हे कुठल्याही 'चालू' समाजसेवकापेक्षा त्याला जास्त चांगले समजलेले असते; पण निर्मितीच्या 'क्लिष्ट' प्रक्रिया आणि पातळी आणि जीवनाचा वेध घेणारी त्याची स्वतःची कुवत यांमुळे बंधने पडू लागतात. निसर्ग, मृत्यू, प्रणय हेच अनुभव काव्यात येऊ लागले म्हणजे तथाकथित समाजसेवक हेटाळणीही करू लागतात. या अशा अ-साहित्यिक प्रकरणांची दखल घेण्याचे कारण नसले तरी गिरींच्या कवितेच्या संदर्भात एक विचार येतो. सामाजिक वास्तव आणि कलावंत यात अपरिहार्य द्वंद्वात्मक संबंध असतात. परंतु केवळ सामाजिक ऋण-कल्पनेतून किंवा बाह्य दडपणातूनही कलावंत आपल्या अंतरीचा दिवा मालवू शकत नाही. या संबंधात एका ठोकळ साम्यानुमानाच्या आधारे अनुभव घेण्याच्या क्रियेसंबंधी समाजाच्या प्रगतीच्या अवस्थांचा दाखला पाहण्यासारखा आहे.

समाजाची उत्क्रांति चार अवस्थांमधून झाली असे जेव्हा आपण मानतो, त्याचवेळी संपूर्ण मानवी समूह एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत गेला असे सरसहा गृहीत धरता येत नाही. उत्क्रांतीच्या या चार ठोकळ अवस्था समाजात आजही दाखवून दिल्या जाऊ शकतात. त्याचप्रमाणे एका सामाजिक वास्तवाला सामोरे जाऊनही कवी वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव एकाच वेळी व्यक्त करू शकतात. एकाच एका वास्त-वाचे राणीछाप ठसे पाडण्याची मर्यादा कलावंत स्वतः-वर कधीच लादून घेणार नाही.

लोकप्रिय आणि प्रचारी विचारधारा, मृत्यू, अध्यात्म, निसर्ग, प्रेम यांपैकी काही अनुभवांना म्हातार-पणात, तर काहींना भविष्यात तर काहींना पलायनात Escapism सोयीनुसार ढकलतात. विषयांची अशी अकलात्मक पातळीवरची छाननी होऊ शकत नाही. तशी शक्य झाली तर सामाजिक अनुभवाने चिंब झालेल्या काव्यातील अनुभवाच्या तुलनेत व्ही. जी. जोगांच्या 'आसावरी' पाठीमागील अनुभवसत्य कमी प्रतीचे आहे असे मानावे लागेल आणि गिरींसारख्यांच्या उत्कट निसर्गप्रेम कवितांची किंमतच कमी होईल. उपमा देऊनच सांगायचे झाले तर गिरींची कविता एखाद्या झाकलेल्या माणकासारखी आहे. त्यांची ही साधना अशीच सुरू राहिली आणि संग्रहाच्या रूपाने पुढे आली तर म. म. देशपांडे, ग्रेस, केचे, भट, आरती प्रभु, चित्रे, सिरास, महानोर या पिढीतील कवितेत एका वैशिष्ट्य-पूर्ण कवितेची निश्चितच भर पडल्याशिवाय राहणार नाही.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

काही कविता

वावटळ

सोनपाचोळा पिवळा
भुऱ्या माळुन कुंतली
चैत्रबावरी सोनेरी
धुंद वावटळ आली.

तेव्हा थरकले ऊन
जरा दचकली छाया
परसात कर्दळीची
जरा लचकली काया !

तरुतरूंनी धरल्या
डोळ्यावरती डहाळ्या
तेव्हा खट्याळ हास्याच्या
हिला फुटल्या उकळ्या.

बंद जाहली कवाडे
मिटू लागल्या खिडक्या
तसतशा येत गेल्या
हिच्या रंगात गिरक्या !

कुठे लागली तरंगू
सुकू घातलेली साडी
परकराची चिटाच्या
हिने केलेली वावडी !

अशी पाहता पाहता
उंच भिडली आभाळा
क्षुद्र धुळीच्या कणांना
आली मनोऱ्याची कळा !

उधळून इथे-तिथे
सोनपाचोळा पिवळा
गेला क्षितीज भेदून
झोत चैतन्याचा भोळा !!

*

तू गेल्यावर

तू गेल्यावर
इंद्रधनू विरल्याचा व्हावा
उदास आठव....

अंतर्यामी यावे दाटुन
काळवंडले जड सांध्य क्षण
आणि मनाचा मोर झुरावा
हताश अंधारी रानातुन....

तू गेल्यावर
आसमंत हे होउन परके
नक्षत्रातिल नवल शिरावे
या वाटातुन या लाटातुन
अनोळखीपण फक्त उरावे....

तू गेल्यावर
चंद्रानेही चंद्र नसावे
या थिजलेल्या रजनीला अन्
शून्य रिते आकाश डसावे !

*

जन्म

आज ख्रिस्तापरि चंद्र
क्रूसावर खिळलेला;
माझ्या मनातला बुद्ध
वनाकडे वळलेला....

मला माहित तुझाही
वीष पिता पिता ओठ
मीरेपरि पोळलेला....

तरी, तरी यशोधरे
नको अश्रु तुझ्या डोळा
तू-मी मिळूनच असा
जन्म उभा जाळलेला !....

*

उ. रा. गिरी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आलिस पहिल्या पावसात तू

आलिस पहिल्या पावसात तू तुषार उधळित अंगावर

क्षितिजावर तव चरण वाजले
वाऱ्यातुन कंकण किणकिणले

रूप तुझे घननीळ उमलले ढगाढगातुन गगनावर
आलिस पहिल्या पावसात तू तुषार उधळित अंगावर

तू येता-हे जग गहिवरले
सजल सावळे ढग हुंदरले

तृषित समुत्सुक खग किलबिलले आषाढाच्या फांदीवर
आलिस पहिल्या पावसात तू तुषार उधळित अंगावर

थेंब जांभळे झरता झरझर
उष्ण धुळीचे थरथरले थर

शतधारांनी कोसळली सर कणाकणातिल वणव्यावर
आलिस पहिल्या पावसात तू तुषार उधळित अंगावर

धुंद तुझ्या स्पर्शात गारवा
उ:शापित हे रान ...ही हवा

मुरते आहे झिरपत अमृत तहानलेल्या मातीवर
आलिस पहिल्या पावसात तू तुषार उधळित अंगावर

ग्रीष्माचा उत्ताप साहिला
भाग्यक्षण हा तेव्हा आला

मृगकरुणेचा पूर लोटला आज नभातुन पृथ्वीवर
आलिस पहिल्या पावसात तू तुषार उधळित अंगावर

घेउनि भेट नव्या स्वप्नांची
चिरनूतन हिरव्या गीतांची

छेडित मधु-मल्हार रसोत्कट इंद्रधनूच्या वीणेवर
आलिस पहिल्या पावसात तू तुषार उधळित अंगावर

*

कर सैल तू गळ्यातिल

कर सैल तू गळ्यातिल
करपाश रेशमाचे
सखि रत्नदीप आता
विझलेत वासनेचे.

अनिरुद्ध चांदण्याचा
पाऊस थांबलेला
पाण्यात क्षीण झाले
प्रतिबिंब अंबराचे.

पूर्वेस हासलेला
गालात शुक्रतारा
पाऊल वाजलेले
प्राचीवरी उषेचे.

खर्जात घर्घराया
लागे दूरात जाते....
ओवीतुनी मिसळले
आवाज कंकणांचे.

कर सैल हे गळ्यातिल
करपाश रेशमाचे
ओतून गीत जा तू
ओठात अमृताचे !

*

प्रस्थान

दूरदूरवर दिसतो अंधुक
अज्ञाताचा निळा किनारा
अन् केव्हाचा खुणवित मजला
क्षितिजावरचा तांबुस तारा

याच किनाऱ्याकडे केधवा
बुद्ध, ख्रिस्त, ज्ञानेश्वर गेले
प्रस्थानाची शुभघटिका ही
पूस तुझे सखि लोचन ओले !

*

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यायचेच तर

यायचेच तर ये वर्षेतच भिजत मृत्तिकेपरी
चिंब चंदनी सुगंध रुजवित गात्रागात्रांतरी.

यायचेच तर ये सोनेरी श्रावण-शिरव्यापरी
रंग रंग तू इंद्रधनूचे माखुन अंगावरी.

यायचेच तर थेंब थेंब ये तरंग उठवित जळी
नितळ कागदी रेशिमओल्या नीलपुष्प-पाउली

यायचेच जर मध्यरात्रिचे मेघश्यामले तुला
जलधारावर छेडित ये मल्हार आर्द्र जांभळा.

यायचेच-ये पण वर्षेतच बरसत अमृतसरी
ग्रीष्मदाह निववीत माझिया भरलेला अंतरी !

*

खळे

आज तुझ्या नजरेत दाटले धुंद चांदणे निळे
तयात लहरत आणि चंदनी भावगंध दर्वळे

तलम स्मितातुन नितळ उमलती निशिगंधाची फुले
अधर गुलाबी थरथरणारा लाजत अर्धा उले

गात्रगात्र तव, आळसलेली जशि कमळाची दळे
अंगांगावर तरंगणारे स्पर्शधुके जांभळे !

बावरलेला बोल, फिटेना नवतीची लालसा
सावरलेला तोल, ढळे परि राहुन राहुन असा !

आज तुझ्या नजरेत दाटले धुंद चांदणे निळे
अन् माझ्याही मनात केले चंद्राने ग खळे !!

*

सृजन

अवरोध किती करशील जळा ?
ही येत हळू वाहेर कळी
पानास निळी ये सृजनकळा
देठात फुटे उद्रेक तळी !

छेदून पटल तव लाटांचे
शैवाल-कवच भेदून उरी
येईल उफाळत कोमलता
रे गर्भातुन वेगात वरी !

उमलेल तदा जमतील अली
रसगंध हिचा भरता भवती
अन् वाऱ्यातुन होइल वार्ता
की सुंदरता फुलली जगती !

अवरोध किती करशील जळा ?
ही येत हळू वाहेर कळी
पानात फुले उन्मेष निळा
देतात स्फुरे चैतन्य तळी !!

*

"वाढा भाकर बाई"

"वाढा भाकर बाई"

रखरखत्या उग्र उन्हातुन
ग्रीष्मातिल ऐन दुपारी
मिटल्या-उघड्या दारादारावरती
खरखरत घशातुन शब्द उमटती दुबळे
"वाढा भाकर बाई"

सुरकुतलेल्या जर्जर कृश देहाची
खाचा भेसुर बनलेल्या डोळ्यांची
लटलटणाऱ्या थरथरत्या हातांची
चिंध्यांची, ठिगळांची, तुटक्या कळकाच्या काठीची
अनवाणी पायांनी फिरते
वणवण करुण कहाणी !
शिणलेल्या वाणीने विनवित
"वाढा भाकर बाई"

दारावरती कोठे
भुंकत राही कुत्रे
असले नसले इमान उसने आणुनि अवसानाने !
आणि घरादारातिल वात्रट पोरे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देति तयाच्या उत्तेजन शौर्याला !
वसल्या जागेवरुनी वाप्ये-वाया
करीत कौतुक अपुल्या व्रात्य प्रजेचे
पाहत बसती मुकाट मोफत गंमत !
भिक्षा मागित फिरणाराला हवीच काही शिक्षा !
....नकळत डोळे होती माझे ओले
अन् अश्रुंनी पुसले जाउन
हृदयविदारक चित्र करुण हे क्षणभर अंधुक होई
दिसू लागते भिकारणीच्या जागी माझी आई !!
माझी आई....
ही नच नुसती माझिच आई
ही तर तुमची-अमुची अवघ्या ही विश्वाची आई
ही नच आई....हा जगजेठी साक्षात !!
लखलखणारा किरिट उन्हाचा लेउन
ग्रीष्म ऋतूच्या रथामधुन हा हिंडत दारोदारी
होउन अंध भिकारी !
मागित भिक्षा तुमच्या-अमुच्या सत्त्वाची, सत्त्वाची
उरल्या सुरलेल्या उष्टयाची चुळकाभर तत्त्वाची !!
उपेक्षाच पण पडता पदरी
सगुण सावळा निघत श्रीहरी पुढल्या दारावरती
शिणलेल्या वाणीने विनवित
"वाढा भाकर वाई"

✱

कोरडाच मी ओठ परंतू

तू भिजलेले नितळ रानफुल
ओल्या पंखांची तू फडफड....
अवचित झडलेली श्रावणसर
तू थेंबांची अधीर तडतड....

तृप्त निथळते केतकिचे वन
धुतली गंधित चिंब धरा तू
सांध्य ढगांचे रत्नरंगि जग
शहारला मल्हार सांद्र तू.

स्नातकुंतला रात ठिवकती
कनक-काजव्यांची तू चमचम
जलवंतीची स्वप्ने फेनिल
तू अमृतधारांची रुमझुम.

लखलखती तू वीज तमातिल
वाऱ्याचा अभिसार गार तू;
दूरदूरच्या नील नभाचा
कोरडाच मी ओठ परंतू !!

✱

स्पर्श

विजेने परामर्श घ्यावा ढगाचा
तसा हा तुझा स्पर्श गे वादळी
शिरे रंध्ररंध्रांतरी गंध, गात्री
रुजे जर्द संवेदना जांभळी.

थरारे तमाचे धुके भोवताली
उभी रात्र वेहोष काळी अशी
नशा दाटलेली नभाच्याहि नेत्री
हवा कापरी आर्त वेडीपिशी.

कुठे अंतरिक्षात कोरीत नक्षी
दिवाणा लकाके, झुके काजवा
मृगाची सळाळून होणार वर्षा....
सुगंधीत आधी सुटे गारवा !

विजेने परामर्श घ्यावा ढगाचा
तसा हा तुझा स्पर्श गे वादळी
दिपे पापणी प्राक्तनाची प्रभेने
झळाळे मनाची कडा काजळी !

✱

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नसते जर चंद्राशी नाते

नसते जर चंद्राशी नाते
नसता या रजनीशी परिचय
नच मिळता मज अभाग्यास जर
नक्षत्रांचा स्नेह निरामय

नसती इंद्रधनूशी सलगी
भाषा थेंबांची मज अवगत
नसते जर काजव्यास कळले
कधीच माझे खिन्न मनोगत

नसता तृणपुष्पाच्या नेत्री
अश्रु दवाचा माझ्यासाठी
या जखमेस्तव शीतल फुंकर
जर नसती वाऱ्याच्या ओठी

क्षितिजापार तुझा जर नसता
अद्‌भुत निळसर भास दाटला
असीम या वेदनेवरी तव
करुणामय कर कधीच फिरला

तर मग माझे झाले असते
काय अदय दुनियेत खरोखर ?
आदळून मम फुटती नौका
'माणुस' नावाच्या खडकावर !!

पण आहे चंद्राशी नाते
या रजनीशी माझा परिचय
म्हणून इथल्या काळोखावर
सदाच आलो मी मिळवित जय !

*

मल्हार-बाधा

आज अंदाधुंद अंधारात हिर्व्या श्रावणाच्या
थेंबवेडी चिंब ओलेती उभी बाभूळ भोळी
हेलकावे काफला वाऱ्यावरी हा काजव्यांचा
अन् विजेची चित्रवीणा छेडणारी रात्र काळी.

केतकीचे रान प्याले मद्य ओल्या गारव्याचे
जांभळ्या वृत्तीत माती बंधमग्ना जागणारी
वादळाचे गीत ओठी मेघमालेच्या शहारे
पैंजणे दूरात धारांची कुठेशी वाजणारी !

रेललेली गात्रगंधा किर्मिजी तंद्रीत पृथ्वी
गूढ स्वप्नासारखे आकाश आहे भारलेले
सोनस्पर्शाची क्षणांच्या होउनी मल्हार-बाधा
विश्व सारे हे सतारीसारखे झंकारलेले !!

*

श्रावण

नुकतीच ओसरली
आहे श्रावणाची सर
गीत ओतून सुगंधी
हिर्व्या ओल्या शेल्यावर.

तृप्त रेलली दुपार
क्षितिजाच्या वक्षावर
थेंबचांदण्या थांबल्या
निळ्या तृणफुलावर.

कुंद वाऱ्यात अजून
आहे किरमिजी ओल
पाणलोटात भगवे
एक आश्वासन खोल !

आहे श्यामल आकाश
इंद्रधनूच्या मिठीत
सप्तरंगी भुलावण
दिशेदिशेच्या दिठीत

नुकताच ओसरला
आहे रेशमी शिरवा
आता पिवळ्या उन्हात
उभा श्रावण हिरवा !

*

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अ. ना. दे. एक व्यक्तिमत्व

श्री. सी. ता. पुराणिक

मे महिन्याचे दिवस. दुपारची वेळ. रस्त्यांवर नुसतं अग्निकुंड पेटलं होतं. घरात बसलेल्यांच्याही जिवाची काहिली होत होती. अंगातून निघणाऱ्या घामाच्या धारा एवढाच काय तो ओलावा. खोलीच्या खिडकीला वाळयाची ताटी तर नव्हतीच पण खोलीत पंखा देखील नव्हता.

सामान्य माणसाला अशा वेळी ग्लानी येते. तो नकळत पेंगू लागतो. एखादी सुरस, चटकदार डिटेक्टिव कथासुद्धा हातातून गळून पडते.

पण अशाही वेळी 'दादा' आपल्या टेबलाशी बसून शांतपणानं "आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास" लिहीत असत.

त्यांच्या ह्या 'थंडपणा'बद्दल मी पुष्कळदा त्यांना चेष्टेनं म्हणत असे, "असल्या या भयंकर उन्हाचा तुमच्यावर काहीच परिणाम होत नाही ? आता वाळयाच्या ताट्या बनविणारे किंवा पंखे विकणारे यांनी आपले धंदे बंद करावे असं तुम्हाला वाटतं की काय ?"

असल्या उकाड्यात बसून लिहिण्यापेक्षा त्यांनी निदान 'टेबल–फॅन' तरी घ्यावा असं मी त्यांना सुचविलं म्हणजे ते म्हणत असत,

"अहो, हा उन्हाळा आता फार तर आणखी पंधरा दिवस. झालं, संपला उन्हाळा ! आता पाऊस आला की ताबडतोब थंडगार होणार !"

'दादां'च्या या उत्तरानं मी मात्र अगदी 'गारेगार' होत असे. वास्तविक त्यांना पंखा घेणं किंवा वाळयाची ताटी लावणं परवडत नव्हतं किंवा ते 'चिक्कू' होते असं मुळीच नाही. पण बाह्य शारीरिक स्वस्थतेची किंवा सुखसोयींची त्यांना फारशी फिकिर नसे. नंतर काही दिवसांनी माझ्या—व विशेषत: घरातील मंडळींच्या—आग्रहामुळं एक पंखा घेतला. पण पुष्कळदा लिहिण्याच्या तंद्रीत त्यांना तो चालू करण्याचंही भान राहात नाही.

धंतोलीतील जागा सोडून 'दादा' धर्मपेठेतल्या स्वत:च्या घरात राहायला आले, तेव्हा त्यांच्या घरावर पाटी लागली—"डॉ. अ. ना. देशपांडे, एम्. ए., पीएच्. डी."

दुसऱ्या दिवशी पाटीवरची 'डॉ.' आणि 'एम्. ए., पीएच्. डी.' ही अक्षरं पुसून टाकून 'अ. ना. देशपांडे' एवढीच अक्षरं शिल्लक ठेवली. मी त्यांना कारण विचारलं, तेव्हा ते म्हणाले, 'मी पीएच्. डी. झालो हे ज्यांना माहीत आहे त्यांना पाटीवर लिहून पुन्हा आठवण करून देण्याची आवश्यकता नाही; आणि ज्यांना ते माहीत नाही त्यांच्याकरता 'अ. ना. देशपांडे' एवढं नाव पुरेसं आहे, नाही का ?"

'दादां'च्या साधेपणाचं आणि निरहंकारी वृत्तीचं हे आणखी एक उदाहरण.

त्यांचं म्हणणं एकापरीनं खरंच होतं. 'अ. ना. देशपांडे' हे नाव ज्यांना माहीत आहे त्यांना ते हिस्लॉप कॉलेजात मराठीचे प्राध्यापक आहेत, पीएच्. डी. आहेत, नामवंत साहित्यिक आहेत, हे सगळं माहीत असणारच. ज्यांना ते प्राध्यापक किंवा साहित्यिक आहेत हे माहीत नसेल त्यांनाही ते एक विद्वान,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वक्ते, व्याख्याते, प्रवचनकार, संत-साहित्याचे व्यासंगी -अभ्यासक आहेत हे त्यांची ज्ञानेश्वरी किंवा अमृतानुभवावरील प्रवचनं ऐकून माहीत झालंच असलं पाहिजे. मग आपल्या पदव्यांची, पाटीवरून त्यांनी हकालपट्टी केली तरी त्यात फारसं काही बिघडलं नाही असं मला वाटलं. पण—

एकदा एक बाहेरगावचे गृहस्थ त्यांना प्रवचनाचं आमंत्रण देण्याकरता त्यांचं घर शोधीत आले. 'दादा बाहेर गेले होते. मी त्यांच्या घरी रोजच जाऊन बसतो. बाहेरची नावाची पाटी पाहून येणारे गृहस्थ क्षणभर गोंधळल्यासारखे दिसले.

"कोण पाहिजे आपल्याला ?" मी विचारलं.

"डॉ. देशपांडे इथंच राहतात ना ?"

"हो. इथंच राहतात; या, आत या, बसा. ते बाहेर गेले आहेत. येतील इतक्यात."

"बाहेरच्या पाटीवर नाव वरोबर लिहिलं नाही. नुसतंच 'अ. ना देशपांडे' असं दिसलं म्हणून विचारलं," ते गृहस्थ म्हणाले.

मी किंचित् स्मित केलं आणि म्हटलं, "पाटीवर त्यांचंच नाव आहे." आपल्या नावापुढे किंवा मागे उपाधी का नाहीत, याचं डॉक्टरसाहेबांनी केलेलं विवेचन मला आठवलं व ते गृहस्थांना कसं समजावून सांगावं याचा विचार मनात येऊन मला थोडंसं हसू आलं होतं. ते माझ्या चर्येवर दिसताच ते गृहस्थ मला म्हणाले, "ते डॉक्टर नाहीत हे मला माहीत आहे. पण कॉलेजात प्राध्यापक आहेत. मग पाटीवर प्रो. किंवा प्रा. काहीच कसं लिहिलं नाही ? किती साधं नाव लिहिलं ?"

एक अतिशय लोकप्रिय-विशेषत: विद्यार्थीप्रिय प्राध्यापक व साहित्यिक म्हणून 'दादां'ची ख्याति आहे. त्यांचं 'अ. ना.' हे नाव सर्वपरिचित आहे. 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास" लिहून मराठी साहित्य-क्षेत्रात त्यांनी जो अधिकार मिळविला आहे त्यावद्दल लिहिण्याचा माझा अधिकार नाही. पण त्यांच्या या 'इतिहासा'च्या दोन भागांवरच आपल्या साऱ्या शिकवणीची मदार आहे हे नागपूरबाहेरील एका कॉलेजच्या प्राध्यापकानं (मराठीच्या) मला प्रत्यक्ष सांगितलं. ते म्हणाले, "प्रा. देशपांडे यांचे हे दोन भाग म्हणजेच आमचं मराठी विषयाचं सगळं ज्ञान. यातल्या माहितीचा व चर्चेचा उपयोग करूनच आम्ही विद्यार्थ्यांना वर्षभर मराठी विषय शिकवितो. त्यांनी हा 'इतिहास' लिहून आम्हा मराठीच्या प्राध्यापकांवर फार उपकार केले आहेत. विशेषत: नागपूरवाहेर इतरत्र असलेल्या कॉलेजांना इतर पुस्तकं उपलब्ध होणं दुरापास्त असल्यामुळं प्रा. देशपांडे यांच्या 'इतिहासा'चाच आम्हाला एकमेव आधार आहे. आमच्या सारख्यांचं 'प्राध्यापक'त्व त्यांच्या ग्रंथावर अवलंबून आहे."

प्रा. देशपांडे यांनी एकट्यानं, एकटाकी, कोणताही गाजावाजा न करता किंवा 'योजनां'च्या जाहिराती न करता आधुनिक मराठी वाङ्मयाचा अद्यावत् इतिहास दोन भागांत लिहून वाङ्मयक्षेत्रात जी अभूतपूर्व कामगिरी बजाविली त्याबद्दल त्यांची सर्वत्र प्रशंसा झाली. 'पुणेकर साहित्यिक नागपूर-विदर्भातील साहित्यिकांना कमी लेखतात; त्यांचा सन्मान करीत नाहीत' ही तक्रार खरी असेल तर ती खोटी ठरावी इतका सन्मान 'अ. नां.'चा खुद्द पुण्यात झाला. महामहोपाध्याय द. वा. पोतदार, प्रा. श्री. म. माटे, प्रा रा. श्री. जोग इत्यादी श्रेष्ठ साहित्यिकांनी त्यांच्या कर्तृत्वाची, लेखनशैलीची आणि उद्योगाची मुक्त कंठानं स्तुती केली. डॉ. चिंतामणराव देशमुखांसारख्या उच्चपदस्थ रसिकांनी त्यांना मुद्दाम पत्र पाठवून त्यांचं अभिनंदन केलं !

या ग्रंथावद्दल पूर्वीच्या मध्यप्रदेश सरकारानं त्यांना १००० रु. चं पारितोषिक दिलं आणि नागपूर विद्यापीठानं 'डॉक्टरेट' दिली. त्यांच्या ग्रंथांची कीर्ती झेकोस्लोव्हेकियासारख्या परदेशांतील विद्यापीठातही पोचली. तेथील एका प्राध्यापकानं त्यांना पत्र पाठवून मराठीच्या अभ्यासाविषयी सल्ला विचारला !

अशा एका प्रथितयश, मान्यवर प्राध्यापकानं— साहित्यिकानं 'बुवा-महाराजा'प्रमाणं ज्ञानेश्वरीवर प्रवचनं सांगावी याचं कित्येकांना फार आश्चर्य वाटतं! कांही प्रच्छन्नपणे नाक मुरडतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कॉलेजात शिकविणारे प्राध्यापक सहसा बाहेर प्रवचनं सांगत नाहीत हें खरं आहे. वस्तुतः संत–साहित्यावर व्याख्यानं–प्रवचनं करण्याचा अधिकार ते विषय शिकविण्याचा ज्यांचा व्यवसाय आहे अशा प्राध्यापकांचाच आहे. पण हे विषय शिकविणाऱ्या बहुतेक प्राध्यापकांना संतांविषयी किंवा त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांविषयी किंवा त्यांतील तत्त्वज्ञानाविषयी मनातून फारशी आस्था नसते. ते शिकवितात फक्त वाङ्मय. म्हणजे ज्ञानेश्वरी शिकवायची असली तर तिच्यांतील काव्य, उपमा, उत्प्रेक्षा, अलंकार इत्यादी 'साहित्यिक' गुणांवरच या प्राध्यापकांची ही व्याख्यानं कॉलेज–कुमार–कुमारींसमोर होत असतात. त्या ग्रंथांतील तत्त्वज्ञानात त्या दोघांनाही काही रस नसतो. आणि ते तत्वज्ञान आपल्या जीवनांत उतरावं अशी तर कोणाचीच इच्छा नसते.

उलट धंदेवाईक 'बुवा' किंवा 'महाराज' यांची जी प्रवचनं देवळांतून किंवा इतरत्र होतात त्यांत श्रोते बहुधा म्हातारे स्त्री-पुरुष आणि बोलणारे 'वक्ते' वक्तृत्वगुण नसलेले पोटभरू भिक्षुक, जुनाट, परंपरागत, अशास्त्रीय आणि बुरसटलेले भावडेपणाचे विचार मांडणारे. अशा प्रवचनांना आधुनिक सुशिक्षित श्रोते क्वचितच जातात.

'अ. नां.'ची प्रवचनं या दोन्ही प्रकारच्या व्याख्यान–प्रवचनांपेक्षा अगदीच निराळी असतात. त्यांच्या वक्तृत्वानं कॉलेजांतले विद्यार्थी तर भारून जातातच पण त्यांच्या प्रवचनात काव्य, शास्त्र, तत्त्वज्ञान, आधुनिक भौतिक शास्त्रांचे सिद्धान्त, देशी व परदेशी वाङ्मय आणि श्रद्धा, तळमळ, जीवनाविषयीची ज्ञानलालसा यांचा फार हृदयंगम संगम असतो. त्यामुळं त्यांची प्रवचनं फार लोकप्रिय होतात.

पण प्रवचनं करणं हा त्यांचा व्यवसाय नव्हे, ती एक जीवनाचं गूढ व प्रयोजन समजावून सांगण्याची व समजावून घेण्याची आवश्यक प्रक्रिया आहे असं ते मानतात. एखादा विषय आपल्याला कितपत समजला हे अजमावून पहायचं असेल तर तो आपण दुसऱ्याला समजावून सांगण्याचा प्रयोग करावा, असं त्यांचं म्हणणं असतं व त्याच दृष्टिकोनांतून ते या प्रवचनांचा प्रयोग करीत असतात. मूलतः दुसऱ्याला 'तत्त्वज्ञान' सांगावं हा हेतू नसून आपणच ते स्वतःला सांगावं आणि आपल्या जीवनात शक्य तितकं उतरविण्याचा प्रयत्न करावा असा या प्रवचनांमागं त्यांचा हेतू असतो.

पण 'कॉलेजातील प्राध्यापक प्रवचनकार कसे झाले?' हीही उत्क्रांती समजावून घेण्यासारखी आहे. माझी त्यांची ओळख झाली त्यावेळी म्हणजे १९४९ च्या सुमारास ते प्रवचनकार बनले नव्हते. त्यावेळी ते श्री. पु. य. देशपांडे यांच्या 'भवितव्य' साप्ताहिकात 'साहित्य–समीक्षा' हे सदर लिहीत असत. नुकतेच म्हणजे १९४५ साली मराठी विषय घेऊन एम्. ए.च्या परीक्षेत पहिल्या वर्गात उत्तीर्ण होऊन नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजमध्ये ते मराठीचे प्राध्यापक झाले होते. त्या विषयाच्या परीक्षेत त्यांनी विश्वविद्यालयाचं सुवर्णपदक मिळवलं होतं.

हिस्लॉप कॉलेजमध्ये शिकविणं, 'भवितव्या'त साप्ताहिक लेखन, फुरसतीच्या वेळी 'इतिहासा'चं लेखन, आणि लोकसेवेचं साधन म्हणून अंधविद्यालय संस्थेत चिटणीस म्हणून काम करणं अशी त्यावेळी त्यांची अनेक व्यवधानं होती. इतकी कामं असूनही कॉलेजमधील महाराष्ट्रभाषा–संवर्धन मंडळ किंवा संस्थेनं चालविलेलं 'नाईट हायस्कूल' यांचीही जबाबदारी त्यांनी स्वीकारली होती.

पण अशा अनेक कामांच्या गर्दीतही माझ्यासारख्या मित्रांबरोबर केव्हाही साहित्य, तत्त्वज्ञान, राजकारण अशा अनेक विषयांवर गप्पा मारण्यास ते तयार असत. 'आता मला वेळ नाही' किंवा 'कामाची फार घाई आहे. पुन्हा केव्हा तरी या' असं त्यांनी कधी कुणाला सांगितल्याचं मला स्मरत नाही.

ही अनेक कामं सांभाळून व नाना प्रकारच्या लोकांशी निरनिराळ्या विषयांवर बोलणीं करून पुन्हा आपल्या 'इतिहास'लेखनाकडे ते एकदम कसे वळू शकतात व त्यावर आपलं लक्ष केंद्रित कसं करू शकतात हे मला अद्याप न उकललेलं कोडं आहे!

मागं त्यांच्या 'आधुनिक इतिहासा'चं लेखन चालू असे. आता 'प्राचीन इतिहासा'चं लेखन चालू आहे. पण अद्यापी त्यांच्या या एक प्रकारच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'अलिप्तते'चं आणि 'स्थितप्रज्ञते'चं कोडं मला उलगडलं नाही, किंबहुना ते अधिकच गूढ होत चाललं आहे. आता त्यांनी इतर व्याप कमी केले असले तरी प्रवचनांचा एक नवीन 'व्याप' त्यांच्या-मागं ते 'नको' म्हणत असतानाच वाढत आहे. याही परिस्थितीत त्यांच्या प्राचीन इतिहासाच्या चार खंडां-पैकी सुमारे ५०० पृष्ठांचा एक छापून तयार झाला आहे, दुसरा लिहून तयार आहे. पुढील खंडांच्या लेखनाची तयारी चालूच आहे. एवढं विस्तृत, प्रचंड आणि सखोल लेखन करण्याचा त्यांचा उरक पाहून मी तर स्तिमित झालोच, पण ज्यांना त्यांच्या या उद्योगाची माहिती आहे त्यांनाही नवल वाटतं. विशे-षतः हा सगळा व्याप संभाळून शिवाय ते प्रवचनं करण्यालाही कसा वेळ काढतात याचं रहस्य कुणालाच कळलं नाही. असो. मी ते प्रवचनाकडे कसे वळले हे सांगत होतो.

वास्तविक कथा, कीर्तन, पुराण, प्रवचन किंवा ज्यांना "आध्यात्मिक विषय" म्हटलं जातं अशा विषयांकडे तरुण माणसं फारशी वळत नाहीत. वयस्क लोकांपैकीही ज्यांचं जीवन आनंदी, सुखसमृद्ध व सफल असेल त्यांचंही लक्ष या विषयाकडे बहुधा लागत नाही. ज्यांना आयुष्यात दुःखाचा, निराशेचा, पराजयाचा किंवा अपघाताचा झटका बसला असेल अशीच माणसं देव–धर्म, ज्योतिष किंवा वर सांगितलेल्या तथाकथित अध्यात्म विषयाकडे वळतात आणि आपल्या हतबुद्ध मनाचं समाधान करण्याचा प्रयत्न करीत असतात.

'अ. नां.'चं जीवन आनंदी आणि सफल आहे. त्यांचा संसार सुखाचा आहे. सौ. सुशीलाताई प्रेमळ व आनंदी गृहिणी आहेत. त्यांच्या आतिथ्याचा आणि पाकशास्त्रातील सुग्रणपणाचा आस्वाद आम्ही मित्रांनी अनेक वेळा घेतला आहे. 'दादां'च्या व्याख्यानप्रवचनांना त्या देखील आवर्जून येतात. आपले यजमान 'देवभोळे' किंवा 'बुवा' बनले किंवा त्यांचं संसाराकडे दुर्लक्ष आहे अशी त्यांची मुळीच तक्रार नाही. उलट त्यांच्या घरी केव्हाही गेलं तरी पति–पत्नींचे सुखसंवाद आणि कुटुंबियांचं कौतुकच कानांवर पडतं.

सुखी संसारात वाह्यतः पूर्णपणं रमल्यासारखे दिसत असलेले 'अ. ना.' ज्ञानेश्वरी–अमृतानुभव यासारख्या वैराग्यपर ग्रंथांचं मनन–प्रवचन करण्याच्या मार्गाकडे कसे प्रवृत्त झाले ? हा 'निवृत्ती'चा पंथ त्यांनी का स्वीकारला ?

या प्रश्नाचं उत्तर शोधणं सोपं नाही. या ठिकाणी एक गोष्ट स्पष्ट करणं आवश्यक आहे, आणि ती त्यांची प्रवचनं ऐकणाऱ्या बहुतेक सर्व श्रोत्यांच्या परिचयाची आहे. ती गोष्ट ही की, 'अ. ना.' प्रवचनं सांगतात ते व्यवसाय किंवा फॅशन म्हणून नव्हे किंवा प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणूनही नव्हे. ते जे सांगतात ते त्यांच्या मनाला पटलं म्हणून सांगतात. त्या-वर त्यांचा स्वतःचा पूर्ण विश्वास आहे. त्यांचं बोलणं वरवरचं, तोंडदेखलं नसून अंतकरणापासून, तळमळीचं असतं. ते जे सांगतात ते कुणाला पटेल किंवा नाही हा विचार त्यांच्या मनापुढं नसतो. पुष्कळदा आपण सांगतो ते श्रोत्यांना चटकन पटण्यासारखं नाही, त्यांच्या परिचित कल्पनांना धक्के देणारं आहे, परंपरागत विचारांच्या व संकेतांच्या विरुद्ध आहे हे त्यांना माहीत असतं. तरीही ते त्यांना जसं वाटतं तसंच स्पष्टपणं पण नम्रपणं सांगण्याचा ते प्रयत्न करतात. प्रसंगविशेषी काही श्रोते थोडेसे अस्वस्थ होतात, पण सांगणाराच्या प्रामाणिक तळमळीबद्दल श्रोत्यांना मुळीच संशय नसतो. ते विचार नवीन, प्रसंगी प्रच-लित समजुतींच्या विरुद्ध असले तरी श्रोते ते आदरानं ऐकून घेतात हे मी अनेक वेळा प्रत्यक्ष पाहिलं आहे.

'अ. नां.'ची प्रवचनं प्रथम येथील थिऑसॉ-फिकल लॉजमध्ये सुमारे १९५०–५१ च्या सुमारास सुरू झाली असं मला आठवतं. त्यावेळी मी त्यांच्या प्रवचनांना सहसा जात नसे. थिऑसॉफिकल सोसाय-टीचे त्यावेळचे चिटणीस कै. पेंडसे हे त्यावेळी 'अ. नां.'कडे नेहमी येत असत. त्यांच्याच प्रोत्साह-नानं आणि योजकतेनं त्यांची ज्ञानेश्वरीवरील पहिली व्याख्यानमाला सुरू झाली. दर गुरुवारी लॉजमध्ये ही प्रवचनं होत, व ती ऐकायला नागपुरातील सुप्रसिद्ध विद्वान श्री. भवानीशंकर नियोगी यांच्यासारखी मंडळी येत. या प्रवचनांमुळं 'अ. नां.'च्या अंगी असलेल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रद्धायुक्त चिकित्सकपणा, व्यासंग, वक्तृत्व आणि चतुरस्र ज्ञान इत्यादी गुणांचा परिपोष व विकास होत गेला.

सोसायटीच्या या परिचयातूनच पुढं अॅनी बेझंट, ब्लॅव्हॅट्स्की, जे. कृष्णमूर्ती वगैरेंच्या वाङ्मयाचा व्यासंगही वाढत गेला व त्यांच्या मनात सुप्त असलेली अध्यात्मविद्येची ओढ वाढत गेली असावी असा माझा अंदाज आहे. एकीकडे ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ इत्यादी संतांच्या ग्रंथांचा अभ्यास व दुसरीकडे भगवान बुद्ध, येशू ख्रिस्त, जे. कृष्णमूर्ती या विभूतींच्या वाङ्मयाचा व्यासंग असा दुहेरी संस्कार त्यांच्या तरुण मनावर त्यावेळी घडत होता.

पण त्यांचा मनःपिंड लौकिक, मान, प्रतिष्ठा, पैसा इत्यादी गोष्टींनी आकर्षित झाला नाही एम्. ए. होईपर्यंत त्यांनी नोकरी केली तीही आपल्या ज्ञानलालसेला पोषक व वृत्तीला अनुकूल अशा शिक्षकाच्या व्यवसायात. याच काळात गांधीजींच्या ' नयी तालीम ' (बेसिक एज्युकेशन) योजनेशी त्यांचा संबंध आला. सेवाग्राममध्ये राहून त्यांनी खादीचं व्रत स्वीकारलं. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचाही त्यांच्या मनावर संस्कार झाला होताच.

अशा आधीच सुसंस्कारित अशा तरुण मनोभूमीत संतांच्या शिकवणीची आणि जे. कृष्णमूर्ती, गौतमबुद्ध या सिद्धांच्या तर्कशुद्ध मूलगामी विचारांची बीजं पडली. त्यांचा परिणाम 'अ. नां 'च्या सध्याच्या मनःप्रवृत्तीत दिसून येतो. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिण्याकरता म्हणून त्यांनी संतवाङ्मयाचा जो सखोल अभ्यास सुरू केला त्यातूनच त्यांच्या जीवनाचं तत्त्वज्ञान घडत गेलं असं दिसतं. भारतीय तत्त्वज्ञानाची बैठक ज्या उपनिषदादी ग्रंथांवर आणि षड्दर्शनांवर आधारलेली आहे त्या सर्व विचारप्रणालींचा त्यांनी फार सूक्ष्म अभ्यास केला आहे. पण या सर्व तत्त्वप्रणालींचा परिचय झाला तरी ' आपल्या जीविताचा अर्थ व हेतू काय ' हे कळत नाही असं त्याचं म्हणणं आहे. आपल्या मनातल्या या प्रश्नाचं उत्तर गौतमबुद्ध किंवा अलीकडच्या तत्त्वचिंतकांपैकी जे. कृष्णमूर्ती यांच्याच विचारप्रणालीत सापडू शकतं असं ते नेहमी प्रतिपादन करीत असतात. पुढंमागं गौतमबुद्ध, ख्रिस्त आणि जे. कृष्णमूर्ती यांच्या विचारांचा परिचय करून देणारा ग्रंथ लिहिण्याची कल्पना त्यांच्या मनात घोळत आहे.

अशा तऱ्हेचा ग्रंथ त्यांनी अवश्य लिहावा असं मलाही वाटतं. कारण माझ्या माहितीप्रमाणं जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा जितका सूक्ष्म व चिकित्सक परिचय ' अ. नां. 'ना झालेला आहे तितका फारच थोडया व्यक्तींना झालेला असेल असं मला वाटतं. इतर कित्येक लेखक खुशाल ' कृष्णाजीं 'च्या नावावर आपल्या स्वतःच्याच विचारांची जाहिरात करीत असतात किंवा ' कृष्णाजीं 'चे विचार आपले स्वतःचे म्हणून दडपून देतात. वस्तुतः कृष्णमूर्तींच्या वाङ्मयाचा ' अ. नां 'चा परिचय अलीकडे प्रसिद्धीची सिद्धी मिळविलेल्या काही लेखकांपेक्षा पुष्कळ जुना व अधिक डोळस आणि तुलनात्मक ज्ञानावर आधारलेला आहे. पण त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्यांनी आपल्या या व्यासंगाचा गाजावाजा केला नाही.

' अ. ना. ' केवळ प्राध्यापक, व्याख्याते, प्रवचनकार किंवा साहित्यिक नसून ते एक अतिशय सूक्ष्म विचार केलेले व करणारे व्यासंगी ' दार्शनिक ' आहेत असं माझ्या अल्पबुद्धीला वाटतं. मित्रप्रेमामुळं माझी त्यांच्यासंबंधीची ही भाबडी कल्पना नसून त्यांच्या रोजच्या जीवनाचं अतिशय सूक्ष्म निरीक्षण करून माझं हे मत बनलं आहे. ते केवळ कृष्णमूर्तींचं तत्त्वज्ञान श्रोत्यांना किंवा वाचकांना समजावून सांगत नसून ते स्वतः प्रत्यही जगण्याचा प्रयत्न करीत राहणारे एक ' साधक ' आहेत असं मला वाटतं.

विदर्भ साहित्य संघाच्या काटोलला भरणाऱ्या वार्षिक अधिवेशनाचं अध्यक्षपद त्यांना देऊन संघाच्या सभासदांनी त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव केला हे यथोचितच झालं. पण या प्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणातही ते आपल्या या नव्या ' जीवनदृष्टी 'चा परिचय श्रोत्यांना करून देतील अशी माझी अपेक्षा आहे. ' अ. नां. 'ना मिळालेल्या या सन्मानाबद्दल त्यांचा एक जुना मित्र म्हणून मी त्यांचं अभिनंदन करतो.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आवड – निवड

—ए. सा. वा.

अभिरुचीचा फब्रुवारीचा अंक चांगला मजकूर असूनही जमलेला नाही. ह्या अंकात श्री. दा. पानवलकर यांची 'सूर्य' ही कथा अप्रतिम आहे. भिन्न प्रकृतीच्या बापलेकाची ही कथा पानवलकर मोठ्या समर्थपणे रंगवतात. कथा वाचताना misfits या इंग्रजी चित्रपटाची आठवण होते. पण तसे त्या दोन्ही कथेत मात्र काहीच साम्य नाही. सदानंद रेगे यांची कविता वेस्ट आहे. पुष्कळ दिवसात रेगे यांची वाचावयास मिळालेली चांगली कविता. शेक्सपियरच्या व्यक्तिरेखामागील अनंत प्रेरणांचा शोध घेण्याचा यशस्वी प्रयत्न.

*

मार्चच्या वसुधेच्या अंकातील श्री. प्रभाकर धोटे व वामन प्रभु ह्यांच्या कथा विसरता न येण्यासारख्या. श्री. धोटे यांच्या 'अपेशी' या कथेतील जानकीमावशीची व्यक्तिरेखा, जीवनात सतत अपयश माथ्यावर घेणाऱ्या स्त्रीची व्यथा त्यातलेली आहे. अपयश पदरी घेऊन उसन्या अवसानाने ती जीवनभर झगडत राहते. त्या झगडण्याला मोल राहात नाही, आपले ईप्सित ते साध्य करू शकत नाही. ज्या जीवनाने उत्तुंग भराऱ्या माराव्या ते पंख कापलेल्या पक्षाप्रमाणे जन्मभर तडफडत राहते. वामन प्रभु यांची 'भिंती' ही कथा, प्रत्येक माणूस हे बेट आहे या कल्पनेचाच पण वेगळ्या तऱ्हेने केलेला आविष्कार आहे. माणसामाणसात भिंती असतात व त्या उल्लंघण्यासाठी त्यांची धडपड सुरू असते हे मोठ्या समर्थपणे या कथेत रंगविले आहे.

'माणूस'चा एप्रिलचा अंक मौलिक झाला आहे तो त्यातील वसुधा पाटील यांच्या 'गानेवाला पंछी' या कथेमुळे. बाईंच्या कथा दीर्घ असतात, पण असतात रंगतदार, वेधक. या कथेत सुरुवातीलाच आपली भेट होते जहांगीर मेरवानजी बाटलीवाला या पारशी मुलाशी. कॅमेराने सौंदर्य टिपण्यासाठी घरदार सोडून ब्राह्मण कुटुंबात राहणाऱ्या मुलाची ही कथा. हळुवार मनाच्या त्या मुलावर केवळ गैरसमजामुळे नाना विपत्ती येतात ! त्यापायी त्याच्यावर वाईट हेतूचा आळ येऊन अखेर अपमानास्पद अवस्थेत त्याला घर सोडावे लागते. सारी कथाच मोठी हृदयस्पर्शी व एका वेगळ्याच अनुभवाचा परिचय करून देणारी आहे.

*

'दीपावली'च्या एप्रिल अंकातील रा. रं. बोराडे यांची 'नथणी' व प्रभाकर पुराणिकांची 'लय' ह्या कथांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. पहिल्या कथेतील 'सलिमा' लक्षात राहते. विश्वासरावांची ही ठेवलेली बाई. ते जेव्हा आपल्या कल्याणी घोडीला नथणी घालतात तेव्हा ती नकळत स्वतःची तुलना कल्याणीशी करू लागते. एक प्रत्ययकारी कथा. दुसरी कथा ही फेरूची कथा. एका माणसात नसलेल्या पुरुषाची कथा. त्याच्या जीवनात दिवाळीचा पाडवा संसाराची स्वप्ने घेऊन येतो. कमळाच्या पानावरचा थेंब क्षणापुरता हिरव्या पानाच्या वैभवात चमकतो. पुन्हा पंकात पडतो. त्या पंकापोटीच त्याचं अस्तित्व. 'नको रे संसार सैंया' या शब्दांत फेरूची व्यथा बोलू

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लागते व वाचकाला त्या व्यथेच्या थेंबांचं अस्तित्व जाणवत राहते.

याच अंकातील श्री. वामनराव चोरघडे यांची मुलाखत मार्गदर्शनपर ठरेल अशीच आहे. त्यात त्यांनी 'कथालेखन' हे निव्वळ रिपोर्टिंग नाही. ती कलानिर्मिती आहे. कथांच्या मागच्या अंत:प्रेरणांचा शोध घेणे, घटनांच्या मागचे भावसत्य शोधून काढणे हे कलावंताचे कार्य आहे' हा विचार मांडला आहे. कले-करता कला हा त्यांचा दृष्टिकोन मात्र विवाद्य आहे.

'संत तुकारामांचा शेवट' हा गोपालसिंग परदेशी यांचा लेख खळबळजनक ठरेल, बहिणाबाई सिऊरकरच्या ओव्यांचा आधार घेऊन त्यांनी तुकाराम महाराजांचा खून झाला होता, त्यांची व शिवाजी महाराजांची कधी गाठभेटच झाली नव्हती अशी विधाने केली आहे. ज्या तर्कांच्या आधारावर भाविक मंडळी तुकाराममहाराज सदेह वैकुंठाला गेले असा निष्कर्ष काढतात, त्याच तर्कांचा आधार घेऊन श्री. परदेशी तुकाराममहाराजांचा खून करण्यात आला असे सांगतात. म्हणजे बुद्धिगम्य पुरावा दोघांजवळही नाही! श्री. परदेशी यांचा दावा कितपत ग्राह्य मानायचा हा प्रश्न उरतोच व हाती उरते केवळ तर्क-दुष्ट संशोधन!

स्वभाव-वैशिष्ट्य

भीष्म–प्रतिज्ञा

भीष्माचार्यांचे वडील, राजे शंतनु, हे आपल्या मध्यम वयात, सत्यवती नावाच्या निषाद–कन्येवर लुब्ध झाले. तिच्याशी विवाह करावा म्हणून त्यांनी तिच्या वडिलांजवळ बोलणे काढले. निषाद–राजाने अशी अट घातली की, राजे शंतनु यांचे नंतर त्यांचे सिंहासनावर, त्यांचे कन्येपासून जो पुत्र होईल त्याने बसावे. भीष्माचार्यांनी नाही. तोवर भीष्माचार्यांना पुत्र–प्राप्ति झाली नव्हती.

पिता–पुत्रात असलेल्या उत्कट प्रेमामुळे, निषाद–राजाची अट मान्य करणे, राजे शंतनु यांना जड वाटले. तथापि त्यांच्या विकल मन:स्थितीकडे पाहून, भीष्माचार्यांनी अशी घोषणा केली की, आपल्या वडिलांच्या गादीवर बसण्याचा आपला हक्क त्यांनी सोडून दिला आहे. भीष्माचार्यांच्या निश्चयावर विसंबून राहावे असाच त्यांचा लौकिक होता. पण निषाद–राजाने तरीही अशी अडचण काढली की, भीष्माचार्यांना पुढे मागे पुत्रप्राप्ती झाली व त्या पुत्राने सिंहासनावर बसण्याची अभिलाषा धरली तर संघर्ष निर्माण होईल. यावर भीष्माचार्यांनी अशी प्रतिज्ञा केली की "यावत् जन्म मी ब्रह्मचर्य–व्रत पाळीन".

त्यामुळे, निषाद–राजाच्या संमतीने, राजे शंतनु व सत्यवती ही विवाह–बद्ध झाली. सत्यवतीला विचित्रवीर्य नावाचा पुत्र झाला. पण राजे शंतनु निवर्तल्यावर निपुत्रिक असतानाच, राज–कुमार विचित्रवीर्य वारला. वंश–खंड होऊ नये म्हणून, राणी सत्यवती, हिने भीष्माचार्यांना असे सुचवले की, त्यांनी विचित्र-वीर्याच्या विधवेशी नियोग–पद्धतीने बद्ध होऊन पुत्र–प्राप्ती साधावी.

आपण केलेली प्रतिज्ञा अटळ आहे असे सांगून, भीष्माचार्यांनी सत्यवतीचे म्हणणे अमान्य केले.

असे आहे, भीष्म–प्रतिज्ञेतील पितृ–प्रेमाचे, निश्चयाचे व त्याग–वृत्तीचे, उद्बोधक व रोचक स्वरूप.

—र. द. सरंजामे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक परीक्षणे

एक कवितासंग्रह : पुन्हा कविता

[संपादक : चंद्रकांत पाटील, ना. धों. महानोर
प्रकाशक : रायभान जाधव, मॅकिकन हॉल, रमाबाई रोड, मुंबई ७. किंमत रु. २–५०]

: १ : मराठी नवकवितेच्या दुसऱ्या दशकातील उत्तरार्धात लिहिणाऱ्या कवींच्या कवितांचा संग्रह. अगदी आजतागायतच्या कवितांचे हे पहिलेच संकलन प्रकाशित करणाऱ्या तरुण कवींचे प्रथम अभिनंदन केले पाहिजे. मर्ढेकर–मुक्तिबोधांनी ज्या नवकवितेचे प्रवर्तन केले त्या नवकवितेला तिसऱ्या पिढीने दिलेले स्वरूप या संग्रहातून जाणवते. नवकवितेवरील टीकेची वावटळ आता शमलेली आहे आणि कवितेविषयीची जाणीव स्पष्ट झालेली आहे असे आपण समजतो. याच दृष्टीने 'पुन्हा कविता' मधील नवथर कवींच्या कवितांकडे पाहिले पाहिजे. मात्र प्रत्येकी एक कविता घेतल्यामुळे आज लिहिल्या जाणाऱ्या मराठी कवितेची प्रकृती नीटशी जाणवत नाही. कारण यातील पुष्कळशा कवींना स्वतंत्र व्यक्तित्व प्राप्त झालेले नाही आणि काहींच्या बाबतीत कवितांची निवडही बरोबर झाली नाही. हा 'अभ्यसनीय' दृष्टिकोण सोडला तर सहज वाचाविशी वाटणारी कविता.

: २ : अभिव्यक्तीची निरनिराळी रूपे मनोवेधक आहेत. आजच्या कवितेला कवितेची शुद्ध भाषा लाभलेली आढळते.

पातळ पिवळ्या तरल मेणबत्त्यांच्या ज्योती
पाण्यासारख्या काळोखांत जशा फुलतात
थरारत, थरारत. तशी फुलं.
(दिलीप पुरुषोत्तम चित्रे)

या अवतरणातील फक्त मनालाच जाणवणारी विलक्षण कोमलता चित्र्यांच्या संवेदनशील शब्दकलेतून साकार झालेली आहे.

ग्रीष्मातील प्रखर उद्विग्नता आणि आत्मिक वैताग समर्थपणे अभिव्यक्त करणाऱ्या ह्या ओळी—

स्तब्ध घरांच्या तिष्ठणाऱ्या भिंती, भिंतीवरील
चित्राच्या रेषांगत; मात्र मधेच वाहणारा वारा :
अभिजात चित्रातील भासामान् हालत्या रेषाच जशा
मधेच झाडांचा रंग ओरबाडून
दूर उडून गेलेल्या राघूच्या
कर्कश्य कर्कश्य आवाजाने जाते
एकांत–काच फुटून खळकन्
एकांत...नंतर घरात, वाऱ्यात, झाडात.
आणि माझ्याही मनात उतरणारा
उन्हाळ्याचा, उन्हाचा
(चंद्रकांत पाटील)

यासारखी आणखी अवतरणे देता येतील. शब्दांचा वापर समजून आणि आशयाच्या वरचढ होऊ न देण्याची जाणीव या कवींमध्ये आढळते. सुभाष पांडुरंग सोमण यांची स्पर्श ही कविता पहावी.

तिथल्या अतर्क्य संध्याप्रकाशात
आपले हात गुंफले जातील; तेव्हा जाणवेल
आपल्याला फक्त एकच की आपल्याही अर्पणाला
मातीची तहान होती......

अत्यंत शांत लय आणि तीमधून जाणवणारा कवितेचा

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निरामय स्पर्श या दृष्टीने ही कविता उल्लेखनीय आहे.

वेगवेगळ्या आविष्काराची रूपे शोधण्याच्या धडपडीलाही काही महत्त्व आहेच. संभाजी कदम, तुलसी परब, गुरुनाथ धुरी, सुरेश मथुरे आणि अरुण कोलटकर यांच्या रचना सर्वस्वी आधुनिक आहेत. परंतु अर्थाची जाणीव स्पष्ट नाही.

: ३ : शब्दांना सहज कळणारा अर्थ आहे हे जाणून लिहिलेल्या दोन कविता उल्लेखनीय वाटतात. बा. भ. बोरकर यांचा प्रेषित उपनिषद्वाणी बोलतो. मात्र या वाणीला 'आज'चा स्पर्श आहे.

मला बघायची आहेत घरे रस्त्याच्या
दुतर्फा उभी होतांना
मला बघायची आहेत वाहने रस्त्यांवरून
सतत वाहतांना
मला बघायच्या आहेत नर–नारी सुदृढ
आणि सतेज होतांना.

अशी या प्रेषिताची अपेक्षा आहे. एक उत्कृष्ट दीर्घ कविता. दुसरी कविता नारायण सुर्वे यांची 'माझे विद्यापीठ.'

नाही सापडला खरा माणूस;
मीही तरी मला अजून कुठे पुरता सापडलो ?

नवी कविता 'खरा माणूस' शोधते आहे काय ? बोरकरांच्या प्रेषित साऱ्या मानवांना 'आनंदाचे महासागर' म्हणून गौरवितो. सुर्व्यांच्या विद्यापीठात कळते : 'ही नंग्यांची दुनिया आहे'. माणसाचा शोध घेणे चांगले आहे !

: ४ : या संग्रहातील कवींच्या विकासाला वाव आहे.

विश्वहृदयाच्या अनाकारबद्ध नाड्या
(भालचंद्र नेमाडे)

जाणून घेण्याची तळमळ या कवींमध्ये आहे. जेव्हा शब्द चैतन्य वाहून न्यावयाचे नाकारतात, इतरांचे दुःख–क्लेश–यातना असह्य होतात तेव्हा हा कवी स्वतःच्याच हृदयाला मोसकतो.

शब्दाविषयीची ही जाणीव या तिसऱ्या पिढीला झालेली आहे.

दोन कादंबऱ्या

१. **अजगर** : लेखक : **चिं. त्र्यं. खानोलकर**, किंमत रु. ३–००
२. **झाकोळ** : लेखक **मनोहर शहाणे**, किंमत रु. ७–००
मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४

: १ :

सुप्रसिद्ध कवी श्री. आरती प्रभु यांची अजगर ही दुसरी कादंबरी. संपूर्णतया अगदी नवीन पद्धतीची. मुखपृष्ठावरील, श्री. वसंत सरवटे यांनी चितारलेली भुतावळ पाहून नवखा वाचक दचकेल आणि कदाचित् पुस्तक बाजूला सारील. पण तो एका वेगळ्याच प्रकारच्या आनंदाला आचवेल. अलीकडे मराठी कादंबरीला चांगले दिवस येत आहेत. जीवनसत्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न काही नवीन लेखक करीत आहेत. विसाव्या शतकाने दिलेल्या एका विशिष्ट भूमिकेतून मानवाचा शोध घेणे, त्याच्या अस्तित्वाचा अर्थ लावणे, हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. अपरिहार्यपणे कादंबरीची रूढ चाकोरी बदलली. खानोलकरांची अजगर ही कादंबरी अशी चाकोरी-बाहेरची आणि आधुनिक आहे. रूढ अर्थाने या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कादंबरीला कथानक असे काही नाही किंवा पात्रपरिपोष नाही.

या कादंबरीतील सगळीच माणसे अगदी विचित्र झपाटल्यासारखी वागतात. कुणा अदृश्य शक्तीची भयाण छाया त्यांच्या जीवनावर पसरलेली आहे. त्या शक्तीच्या पकडीतून कोणाचेही आयुष्य निसटू शकत नाही. त्या कुणा अदृश्याच्याच तालावर प्रत्येकाची पावले पडत आहेत आणि तो कोण हे कुणालाही ठाऊक नाही.

सेवानिवृत्तीनंतरच्या अस्वस्थतेच्या पोकळीत गिरक्या घेणारे हरिपंत चौगुले, सदैव वाट पाहात उभा राहणारा सोपानचा बाप, स्वतःचीच पावले मोजीत फेऱ्या घालणारे धारप, सारख्या अपघाताच्या नि मृत्यूच्या बातम्या सांगत फिरणारे पावसकर, अज्ञात नाटककाराच्या चिंतनात हरवलेली आणि नाटकात वावरल्यासारखी वागणारी इंदू—प्रारंभीच्या प्रकरणात भेटणारी ही पात्रे म्हणजे एक एक प्रतिमाच; त्यांची प्रत्येक कृती प्रतिमात्मक. या प्रतिमांद्वारा सुचविलेला आशय थरारून टाकणारा आहे.

मानवी अंतर्मनातील भावनासंवेदनांचे बाह्य वर्तनावर होणारे आघात; त्या आघातांमुळे प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपासून तुटलेली असणे. हरिपंतांच्या भाषेत सांगायचे झाल्यास मानवी शरीरांचा उदंड व्याप म्हणजे कसल्या तरी चिवट खडकाळ मज्जेच्या दोरांनी व्यापलेली गर्दी. हे एक प्रचंड जनावरच. अनेक पायांचे. आणि कुण्या पोलादी शक्तीने त्याचे खंड खंड केले आहेत. प्रत्येक खंड दुसऱ्या खंडाचा स्वाहाकार करू पाहतोय. पंतांकडून असे वर्तन घडले. निवृत्तीच्या पहिल्याच दिवशी ते मोरे पट्टेवाल्यास स्वतःच्या खुर्चीवर बसण्यासाठी सांगतात. तेव्हापासून मोऱ्याच्या अंगात एक केसाळ कुत्रे संचारते. तो वारंवार पंतांकडे येतो आणि गयावया करून सांगतो की हे जे संचरविले आहे ते काढून घ्या. परंतु पंत अगतिक आहेत. ते काहीच करू शकत नाहीत. बायको मरून बेचाळीस वर्षे होऊन गेली आणि आता पेन्शनराचे जीवन. रिकामे रिकामे. त्यांचे मन अतिशय हळवे झाले आहे आणि दाबून ठेवलेली वासना वर उफाळली आहे. काहीही आधार नाही. कुणाचीही सोबत नाही. स्वतःच्या मुलीसारख्या इंदूला—'तू नुक्तीच धंद्यात शिरलेली एक', 'बोलायला वेळ नाही. फेड ते तेवढं.' अशा भाषेत आपली कामवासना सांगतात. इंदू या गोष्टीकडे एक नाटक म्हणून पाहते. तीही या नाटकात भाग घेते. पंतांच्या मनातील सारी शून्यता संपूर्ण कादंबरीत कुशलतेने चित्रीत केलेली आहे.

या दृष्टीने खानोलकरांच्या भाषेचेही कौतुक केले पाहिजे. प्रत्येक शब्द अर्थवलये निर्माण करणारा. पृष्ठ ५९ वरील इंदूच्या हास्याचे वर्णन अप्रतीम आहे. 'घावातून एखादी चिळकांडी फुटावी तशी हास्याची एखादी उबळ मधूनच फुटे आणि इंदू छाती दाबून धरी.' विलक्षण वेडसर आणि दुःखद हास्याचे हे परिणामकारक वर्णन किंवा पान ९५ वरील 'वाटत होते की ईश्वराने केवळ इतकीच दोनच अमोलिक ढुंगणे याच्या नशिबी घातलीत.' या ओळीतील तीक्ष्ण उपरोध ज्वलंत आहे.

एक चांगली कादंबरी दिल्याबद्दल खानोलकरांचे अभिनंदन.

: २ :

मनोहर शहाणे यांचीदेखील 'झाकोळ' ही दुसरीच कादंबरी. एका मध्यमवर्गीय कुटुंबातील तरुण मुलाच्या कोंडमाऱ्याचे चित्रण या कादंबरीत केलेले आहे. पार्श्वभूमी म्हणून बेचाळीसच्या आंदोलनाचा काळ घेतलेला आहे. परंतु त्या विशिष्ट काळाशी कादंबरीतील प्रमुख पात्रांचा विशेष संबंध नाही. गोपाळ कुळकर्णी हा या कादंबरीचा नायक. घरी आई आणि वडील. कमावणारे फक्त वडीलच. ते गोपाळला वारंवार तोडून बोलत असतात. त्यांच्या धाकाखाली गोपाळचे बालपण कोमेजून गेलेले असते. त्यामुळे गोपाळच्या मनात वडिलांविषयी अत्यंत घृणा आणि तिरस्कार वाटत असतो. 'आपण परके होतो, आपण कुठून आलो हे माहित नसतानाही, केवळ त्याच्या घरात आलो म्हणून या माणसानं आपल्याला वाढवलं.' अशी गोपाळची वडिलांबाबत विचारसरणी आहे. घरच्या धाकामुळे गोपाळचा स्वभाव एकलकोंडा आणि विचारी बनला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

आहे. गावापासून दूर ठिकाणी एकटाच जाऊन वसतो. तो स्वतःविषयी आणि स्वतःचा विश्वाच्या संबंधा-विषयी विचार करू लागतो. विकारातून जन्म झालाय आपला आणि त्यापुढे साऱ्या जगाशी, विश्वाशी आपला संबंध येत गेला ही जाणीव त्याला होते.

मनोहर शहाणे यांची शैली चांगली आहे. अर्थगर्भ छोटी छोटी वाक्ये वापरल्याने तपशीलाला काट मिळाला आहे. अधिक तीव्रता येऊ शकली आहे. परंतु गोपाळचा आणि इतर व्यक्तींचा परस्परांशी संबंध, घडत जाणाऱ्या लहानमोठ्या घटना, गोपाळचे चिंतन यांचा मेळ नीट जमला नाही. तरीपण शैलीच्या नवीनतेसाठी ती कादंबरी अवश्य वाचली पाहिजे.

—वसंत आबाजी डहाके

स्वभाव-वैशिष्ट्य

पहिले बाजीराव पेशवे व मस्तानी

थोरामोठ्यांच्या आदर्श वागणुकीने, समाजातील नैतिक नियमांचे पालन होते. जेव्हा जेव्हा या नियमांचे उल्लंघन होते, तेव्हा तेव्हा साहाजिकच लोकापवाद निर्माण होतो. तथापि, आपल्या अलौकिक कर्तृत्वाने लोकहित साधणाऱ्या अथवा अद्वितीय पराक्रमाने स्वदेशाचे सरंक्षण करणाऱ्या, अशा व्यक्तींच्या बाबतीत, नैतिक नियमांचे उल्लंघन झाले तर ते कधी क्षम्य ठरते व कधी ठरत नाही.

इंग्लंडला परकीय स्वारीच्या संकटातून वाचवणारा आरमारी कुशल लॉर्ड नेलसन व त्याची प्रेयसी लेडी हॅमिल्टन, यांच्यातील प्रणयाची, नेल्सन अथवा त्याची प्रेयसी यांना समाजाकडून झळ सोसावी लागली नाही पण त्याचे समकालीन रणधुरंधर पहिले बाजीराव पेशवे यांच्या बाबतीत मात्र तसे घडले नाही.

महंमदखान वंगष या मोगली सरदाराने बुंदेलखंडावर स्वारी केली तेव्हा राजा छत्रसाल याने बाजीरावपाशी मदतीची याचना केली. बाजीरावने महमदखानाचे पारिपत्य केल्यावर, राजा छत्रसाल याने पेशव्यांना जहागीर देवू केली व त्या वेळच्या रिवाजाप्रमाणे, आपल्या दरबारी असलेली मस्तानी नावाची सुस्वरूप तरुण नर्तकी बाजीरावला प्रदान केली.

मस्तानीचा पिंड भावनाप्रधान होता. बाजीरावाच्या शौर्यावर लुब्ध होऊन त्यांच्यावर तिची अढळ निष्ठा जडली. प्रत्यक्ष मोहिमेच्या रणधुमाळीत, घोड्यावर स्वार होवून ती बाजीरावाच्या समवेत असे. एकमेकांशिवाय त्या दोघांना क्षणभर राहवत नसे. पुण्यास शनिवारवाडा बांधला तेव्हा बाजीरावाने मस्तानीकरता त्यातील एक भाग निराळा असा याटला होता व त्या भागात जाण्यायेण्याच्या दिंडीदरवाज्याला पुढे मस्तानी दरवाजा असे नाव पडले. तिच्या पोटचे पुत्रसंतान पुढे-बुंदेलखंडात वांद्याचे नवाब झाले.

बाजीरावाच्या वाढत्या लौकिकाबद्दल ज्यांना वैषम्य वाटत असे, अशा लोकांनी बाजीरावला स्थान-भ्रष्ट करण्याचे पुष्कळ प्रयत्न केले. पण छत्रपति शाहू-राजांच्या प्रगल्भ वृत्तीमुळे ते सफल झाले नाहीत. तथापि बाजीरावाच्या आप्त-वर्गाची कड घेण्याच्या निमित्ताने पुढे मस्तानीला बंदिवास सोसावा लागला. बाजीराव त्यावेळी नर्मदेच्या काठच्या प्रदेशात मोहिमेवर होते. मस्तानीपासून झालेल्या ताटातुटीमुळे त्यांची प्रकृती ढासळली व सन १७४० च्या एप्रिल महिन्याच्या २८ तारखेस, रावेर येथे त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यानंतर थोड्याच अवधीत, बाग मोकलून, पुण्यास बंदिवासात असतानाच मस्तानीचा अंत झाला.

बाजीरावासारख्या पराक्रमी पुरुषाचा उत्साह द्विगुणित करणाऱ्या मस्तानीला व तिच्या गुणी बाजीरावाला लोकापवादाची जी झळ बाधली त्याविषयी इतिहासकारांनी विस्मय व्यक्त केला आहे.

—र. द. सरंजामे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चित्ररसोत्पत्ती आणि चित्ररसास्वादन

—धनंजय नाकाडे

अहोरात्र आपण आपले जीवन अव्याहत निरनिराळ्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, नैतिक जबाबदारीने सांभाळीत असतो, तरी पण त्यातच निरनिराळी नाटके, कादंबऱ्या, काव्य, चित्रप्रदर्शने वगैरे विविध प्रकारचे मनोरंजनाचे प्रकार अवलोकून आनंद घेत असतो. बोध घेत असतो. प्रसंग कोणतेही का असेना, जीव धोक्यात घालून, युद्धाच्या वेळी सुद्धा त्याचे रसास्वादन चाखण्यास आपण कमी करीत नाही. वाटेल ती झीज सोसण्यास आपण तयार होतो. याचाच अर्थ असा की, त्यातील मर्म आपण आत्मसात केले असते. रसोत्पत्ती होत असताना आपणास जो अवर्णनीय आनंद मिळतो तो ज्या प्रकारचा आहे त्याचा खरा गोडवा आपणास चाखावयास मिळालेला असतो. मातिसे, पिकासो, सेजा, वर्ग, बुके यांची आधुनिक चित्रे आपणास रिझवितात आणि आपण पुन्हा पुन्हा त्यांना पाहतो तरी त्यांच्या कलाकृतींचा वीट येत नाही. त्याशिवाय लिओनार्दो दा विन्सीचे मोनालिसा आजही कमी पडत नाही. कित्येक वर्षांपासून प्रगतीच्या काळातही तिचा गोडवा तिळमात्रही कमी झालेला नाही. रुबेन्सची चित्रे आपण पाहत असताना आपणास जो आनंद होतो, तोच आनंद टर्नर, रॉफेल वगैरेंची चित्रे पाहून होत असतो. मग ती पाश्चिमात्यांची असोत वा भारतीय चित्रकारांची असोत. चित्रकारांची जात येथून तेथून एकच. पण सर्वांच्या चित्रांची रसोत्पत्ती हा गुण प्रमुख ठरतो.

चित्रात रेषा, रंग आणि आकार असले म्हणजे त्याला चित्र म्हटले जात असेल तर ती गोष्ट रसोत्पत्तीच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही. 'चित्र' हे मनुष्यस्वभावाचे आणि सृष्टीचे हुबेहूब रेखाटलेले चित्र होय. म्हणून त्याच्या रसास्वादनाने मनुष्यास आनंद होतो, आल्हाद वाटतो. अंतर्दृष्टीने शांतपणे विचार केल्यास चित्र मनुष्याच्या स्वभावाचे आणि सृष्टीचे यथार्थ दर्शन घडविते; आणि चित्र पाहताना आनंद होतो, हे निर्विवाद आहे. यात मनुष्याच्या मनोधर्माचा थोडासा विचार करणे आवश्यक आहे. जागृतावस्थेत मन चंचल असता त्यात जे मनोव्यापार चालू असतात, त्याचे संवेदना, इच्छा व ज्ञान असे तीन वर्ग पडून यास 'मन' असे म्हणतात. या तिन्ही पैकी संवेदनेशी चित्रणाचा अधिक जवळचा संबंध आहे. अनुकूल आणि प्रतिकूल संवेदनेतील सुख आपणास आवडत असले तरी दुःख मात्र मानवास नकोसे वाटते. अनुकूल संवेदना उत्पन्न करण्याकरिता कलेची निर्मिती होते. कारागिरी मात्र याकरिता जन्मास येत नाही. या दोन्हींची जातच भिन्न आहे. केवळ ज्ञान, मनोरंजन याकरिता चित्रे नसतात. या चित्रणात अंतर्बाह्य सृष्टीशिवाय दुसरा कोणताच विषय राहू शकत नाही. यात कल्पनीय वस्तूची परमावधी झाली. मनातील अनंत व्यापार यातीलच काही सुखानुभवाचे आणि ज्ञानाचे विषय असतात. ज्ञान म्हणजे अंतर्बाह्य सृष्टीतील वस्तूचा यथार्थ निर्णय. चित्रही असेच आहे. सुखावह होण्यास मनुष्याला अनुकूल संवेदनोत्पादक व्हावे लागते. चित्रातून ज्ञानप्रचार व प्रसार होऊ दिल्यास चित्रकारांच्या प्रतिभाशक्तीस मांद्य येते, ही गोष्ट काहीशी खरी काहे. ज्ञानामुळे आनंद होतो त्यामुळे ही गोष्ट

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इतकी टाकाऊ नाही की चित्रनिर्मितीस यामुळे पूर्णतः बाधा येत असते व कलाकृतीचे मूल्य ठरविण्यास ही गोष्ट कमी प्रतीची भासते. प्रत्येक विषयावर बऱ्याच चित्रकारांनी चित्ररेखाटन केल्यामुळे नवोदितांना नवे विषय हाताळावे लागत आहेत. पण हे क्षेत्र कमी पडत आहे. ज्ञानाच्या वाढत्या प्रसारामुळे जुन्याच चित्रणावर नवीन चित्रण केले जात आहे. त्यामुळे नवीन चित्रण तितकेसे परिणामकारक किंवा प्रभावी ठरत नाही आणि त्याला एक प्रकारचे मांद्य आले आहे असे वाटते. टर्नर, रॉफेल, लिओनार्दो–दा–व्हीन्स, रुबेन्स वगैरेंनी जे चित्रण केले ते सर्वसाधारण जुन्या–नव्या विषयांवर. पण वर्ग, मातीसे, व्हानगॉग, गोया, मोंदिय, लेंगर, सेजा, पिकासो, अमृता वगैरेंनी सर्वसाधारणपणे वरील चित्रकारांपेक्षा नवीन सृष्टी हाताळली. भारतातही असेच दोन विचारप्रणालींचे चित्रकार दिसतात. एक अजिंठा चित्रणापासून राजा रविवर्म्यापर्यंत आणि आज अमृता, नंदलाल, हेंवेल, आबालाल रहमान, लालाकाका, रवींद्रनाथ, हुसैन वगैरेंचे चित्रण यात बराच भेद आहे. पूर्वीची चित्रकला अध्यात्मावर, धर्मावर अधिष्ठित होती, पण त्यानंतरची चित्रे सामाजिक, राजकीय दृष्टिकोनातून दृढ झाली. पूर्वीच्या धार्मिक चित्रणावर रविवर्म्यानंतर मुळगावकर, दलाल, पंडित, सिंधल यांनी चित्रण केले, पण ते इतके प्रभावशाली ठरत नाही. अजिंठा चित्रे किंवा राजा रविवर्म्यांनी जे चित्रण केले आहे ते अधिक मौल्यवान आहे. कारण त्यावेळपर्यंत हे विषय जुने असलेले असले तरी चित्रणाची पद्धत नवीन होती. पण नंतरच्या काळात विषय जुने व चित्रण जुन्याच विषयांवर झाले. त्यामुळे धार्मिक चित्रणास आज थोडी उतरती कळा आली म्हटल्यास चूक होणार नाही. म्हणूनच आजचे असले चित्रण लोकप्रिय होऊ शकले नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक वेळी कलेची अभिरुची एकसारखीच राहणे शक्य नाही. तसेच प्रत्येक काळात प्रभावशाली चित्रकार निर्माण होतातच असे नाही. राजा रविवर्मा, रुबेन्स, लिओनार्दो, रॉफेल, टर्नर, पिकासो, अमृता हे आपआपल्या काळात आपला प्रभाव दाखवितात. स्थितिगतिनुसार कलाकृती निर्माण करावी लागते. त्यात कलावंताच्या व्यक्तित्वाचा भार येत असतो. म्हणूनच कला आत्मनिष्ठ किंवा व्यक्तिनिष्ठ असते. केवळ वस्तुनिष्ठ रहात नाही.

पूर्वीचा चित्रकार आपल्या चित्रणात सत्यकथन करीत असे, हे त्यांची चित्रे पाहिल्यानंतर कळून येईल. चित्रकार सत्य सांगत होते. ते शास्त्रीय सत्याप्रमाणे गूढ नव्हते, पण आधुनिक चित्रकार आज आपल्या चित्रणात शास्त्रीय गूढ तत्त्वे सांगण्याचा प्रयत्न करतात. शास्त्रीय सत्ये इतकी गूढ असतात की ती समजण्यास तपांच्या अध्ययनाची आवश्यकता असते. म्हणूनच भावी सत्ये ही आज दुर्बोध वाटतात. अर्थात अशा सत्याचे चित्रणही तसेच दुर्बोध रूप धारण करीत आहे. चित्रात जी सत्ये गोवावयाची त्यांची योग्य निवड करण्यास चित्रकारास पराकाष्ठेचे श्रम पडतात. पण तेच प्रेक्षकास समजण्यास मुळीच श्रम पडत नाहीत. आणि कष्ट किंवा श्रम पडत असतील तर ते समजण्यास योग्य नाही. पण आज प्रयोजनास व समजण्यास कष्ट पडतात. त्यामुळे आजच्या चित्रणात दुर्बोधता आलेली आहे. पूर्वीच्या चित्रणात अनुकूल संवेदनोत्पादक असले पाहिजे असे होते, पण आज ही परिस्थिती राहिलेली नाही.

तरी पण दोन्ही चित्रणात प्रतिकूल किंवा अनुकूल चित्रण आहे. प्रतिकूल किंवा अनुकूल चित्रण फार पूर्वीपासून होत आहे. प्रतिकूल चित्रणात दुःखाचा वाटा आहे आणि तो उचलण्यास चित्रकारांप्रमाणेच प्रेक्षकही आहेत. पण या दुःखाची तीव्रता आणि अनुभवलेल्या दुःखाची तीव्रता यात फरक आहे. द्रौपदीचे वस्त्रहरणाचा प्रसंग आपण चितारतो तेव्हा किंवा जूलिअस सीझरचा खून होतो, त्यावेळचा प्रसंग चित्रित केल्यानंतर प्रेक्षक किंवा चित्रकार यांना त्या रेखाटनात आणि पाहण्यातही एक प्रकारचा आनंद आहे, म्हणूनच त्याचे चित्रण आपणास रिझविते, आनंद देते. प्रत्यक्ष अनुभव आणि चित्रणातून संवेदना निर्माण होऊन झालेले प्रतिकूल संवेदन यात फरक आहे म्हणूनच आपण दुःखद प्रसंग चित्रात पाहू शकतो. नाहीतर हे चित्रण प्रतिकूल आहे; आणि दुःखच होते आहे, असे जर झाले असते आणि त्या प्रतिकूल चित्रणांतून जर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुकूल आनंद लाभले असते तर हे चित्र पाहणारे पाहू शकले नसते आणि चित्रकाराने ते काढले नसते. अर्थात प्रतिकूल चित्रणातही आनंद आहे, म्हणूनच त्याचे चित्रण होत आहे. केले जात आहे, केले आहे.

पण चित्रकारात आणि प्रेक्षकात थोडा फार फरक आहे. चित्रकार ज्यावेळी चित्र तयार करतो त्यावेळी त्याला प्रतिभाशक्ती स्फुरलेली असते. आपल्या स्वानुभवाच्या तीव्रतेवर तो आपले रेखाटन करीत असतो. द्रौपदीवस्त्रहरण किंवा शिशुपालवधाचे चित्रण राजा रविवर्मा यांनी केले तेव्हा राजा रविवर्म्याचे संवेदन त्याविषयी चिंतन, मनन, अवलोकन इतरांपेक्षा अधिक होते. त्या प्रसंगाच्या वेळी जणू काही राजा रवि हजर होते. प्रत्यक्ष द्रौपदीची, दुःशासनाची भूमिका त्याला घ्यावी लागते. त्यांचे अनुभव, त्याच्या संवेदना, स्थिती, गती आणि कृती यांच्या अनुरोधाने उपभोगाव्या लागतात. चिंतन मननाने त्या अधिकाधिक तीव्र होत जातात. त्यामुळे ह्या प्रसंगाचे चित्रण ते त्या अनुभवाच्या जोरावर त्या अनुभूतीतून करीत असतो तेव्हाच त्या चित्रणात अभिव्यक्त झालेली अभिव्यक्ती अत्यंत तीव्र असते आणि त्या तीव्रतेवरच ती कलाकृती संवेदनशील ठरत असते. त्यामुळेच ती कलाकृती अधिक सरस, रसपूर्ण व भावपूर्ण उमटलेली व्यतीत होते व प्रेक्षकांवर तिचा ठसा किंवा परिणाम तितकाच जोरदार असतो. कारण प्रेक्षक जेव्हा चित्राला पाहतो तेव्हा त्याच्यावर त्या चित्राचा परिणाम रसोत्पत्तीच्या दृष्टीने होऊन संवेदना निर्माण होतात व त्या अनुकूल प्रतिकूल संवेदनांची जाणीव त्याच्यातील तीव्रतेने होते. त्यातूनच अनुभूतीची क्रिया घडते आणि त्या अनुकूल–प्रतिकूल संवेदनेप्रमाणे तीव्रतेच्या कमी जास्त प्रमाणात प्रेक्षकांचे मनात ती कलाकृती रसोत्पत्ती करून आनंद देत असते. अनुकूल किंवा प्रतिकूल चित्रणात कमी जास्त तीव्रतेच्या प्रमाणात काही प्रेक्षकांना सुखदुःख होत असते व आनंद मिळत असतो पण अनुकूल चित्रांच्या आनंदापेक्षा प्रतिकूल आनंदाची परिसीमा थोड्या प्रमाणात का होईना पण आनंद देण्याच्या बाबतीत कमी प्रतीची ठरते. त्याचे कारण स्थिती, गती आणि कृती यात मेळ जुळून जर आले नाही किंवा प्रेक्षकांचा दृष्टिकोन त्या तऱ्हेचा परिपक्व नसेल तर ते प्रतिकूल चित्र त्यात रसोत्पत्ती पूर्णतः करू शकत नाही आणि त्या प्रेक्षकांना रिझविण्यास आनंद देण्यापेक्षा दुःखाची छटाच त्यात अधिक जाणवू लागेल. मनाची परिपक्वता ज्या तऱ्हेची असेल त्या तऱ्हेचा आनंद त्या कलाकृतीपासून प्राप्त होईल. रसास्वादनाच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास रसोत्पत्ती ज्या चित्राच्या चित्रणातून होत असते ते चित्र 'चित्र' या संज्ञेस पोहोचू शकते. अन्यतः चित्र असूनही जर हे कार्य घडले नाही तर ते चित्र—'चित्र' असूनही चित्र ठरत नाही. चित्रणाचा ध्यास घेऊन रेखाटलेले अंतर्बाह्य नीरस चित्र रसपूर्ण ठरू शकत नाही.

पत्रव्यवहार

३ मनाली, आगरबाजार
मुंबई २८
दि. १२–४–६६

स. न. वि. वि.

युगवाणी व. २०, अं. १० (मार्च १९६६) चा अंक पाहिला. त्यांतील डॉ. कानडे आणि सु. बा. कुळकर्णी यांचा लेख लक्षणीय वाटला. पण त्यात पृ. ५०७ वर—

'मी तुमचा धाकला बंदु। झने वदु करा—ख्रिस्तपुराण ११–१२ हे उदाहरण देऊन त्यातील 'वदु' हा शब्द सं. 'वधु' वरून आला असून तो स्त्रीवाचक आहे, असे मांडले आहे, ते बरोवर नाही. तेथे जो अर्थ अभिप्रेत आहे तो असा:—मी तुमचा धाकटा भाऊ आहे, तेव्हा माझा वध (वदु) करू नका (झने करा)' कळावे लो. अ. हे विनंती.

स. गं. मालसे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

‘देशपांडे सर’

—श्री. प्रभाकर चांदेकर

कुणाही व्यक्तीबद्दल लिहिणे ही एक अतिशय कठीण आणि नाजुक बाब आहे. मला अ. नां. बद्दल वाटणाऱ्या जवळिकेमुळे मी अ. नां. बद्दल गौरवपर लिहिले तर माझ्यावर भाटगिरी केल्याचा आरोप सहज करता येईल; त्यांचे दोषदर्शन करावे तर तसा माझा अधिकार नाही. “मज काय त्यांचे उणे असे ?” याची मला जाणीव आहे. दुर्दैवाने माझी रास तुळा असल्यामुळे मला कुणाचेही आणि कशाचेही मूल्यमापन करणे अवघड वाटते.

अ. ना. दें.चा सगळ्यात मोठा दोष म्हणजे ते माणूस आहेत. दुसरा मोठा दोष म्हणजे ते कुटुंबवत्सल आहेत. संतांना तर सोडाच पण संत–वाङ्मयाचा अभ्यास करणारालाही माणूस म्हणून समाजात वावरताना एखाद्या गुन्हेगाराचे स्वरूप येते. “काहो, एवढा संत–वाङ्मयाचा अभ्यास करणारा माणूस पण क्रोधावर काही ताबा नाही याचा”, असा शेरा कुणीही संतापी माणसाने सहज मारावा. फोडणीच्या वरणात थोडेसे मीठ कमी पडले तर पत्नीवर क्रोधाग्नीचा वर्षाव करणाऱ्या माझ्या एका मित्रानेच असा शेरा एकदा मारला होता. एखाद्या ठिकाणी व्याख्यानाला जाताना कितीही क्षुल्लक का असेना मानधन मिळावे असे अ. नां.चे मत आहे. पण त्यामुळे “काय फायदा संत–वाङ्मयाचा अभ्यास करण्यात ?” असे मत संस्थेच्या पैशाने मला एका उपहारगृहात चहा पाजणाऱ्या एका कार्यकर्त्याने व्यक्त केले होते. एखाद्या नाटककाराने वा लघुकथा लेखकाने असे मानधन मागितले तर त्याचा तो अधिकारच आहे असे मत आता रूढ होऊ लागले आहे. पण संत–वाङ्मयावर तिकिटे लावून व्याख्यानमाला गुंफवून घेणाऱ्यांनासुद्धा व्याख्यात्याने मानधनाची अपेक्षा वा स्वीकार करावा यात महदाश्चर्य वाटते. त्या मानधनाचा विनियोग चार नवीन ग्रंथ विकत घेण्यात होईल, याची जाणीव राहात नाही.

सुमारे वीस वर्षांपूर्वी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन सुवर्णपदकाचे मानकरी झालेले अ. ना. हिस्लॉप महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. मराठी विषय मी घेतला नसल्यामुळे मी त्यांचा वर्गातला विद्यार्थी असा कधीही नव्हतो. पण ‘महाराष्ट्र भाषा संवर्धक मंडळात’ अ. ना. काम करू लागले तेव्हा त्यांचा आणि माझा परिचय झाला तो आजपावेतो तसाच दृढ आहे. मोकळेपणाने विद्यार्थ्यांमध्ये मिसळणारे, रमणारे, हास्यविनोदाने वर्गात एक अभ्यासानुकूल वातावरण सहज उभे करू शकणारे प्राध्यापक म्हणून ते लवकरच विद्यार्थीवर्गाला प्रिय झाले. विद्यार्थ्यांबरोबर सहलीला जाण्यात आपली ‘डिग्निटी’ कमी होते असे न मानणारे माझ्या आठवणीतले ते पहिलेच प्राध्यापक ! त्यांनी कुणावरही केवळ सूडबुद्धीने अन्याय केला असेल असे मला खरोखरीच वाटत नाही. बरेचदा आपल्याला त्रासदायक आणि जाचक होणारा ‘न्याय’ हा अन्याय वाटतो हा भाग वेगळा !

अ. नां. च्या व्यक्तित्वाचा सगळ्यात आकर्षक पैलू मला जाणवतो तो म्हणजे त्यांच्या ठिकाणची जिवंत जिज्ञासा ! अशी जिज्ञासा क्वचित पाहावयाला मिळते. केव्हाही त्यांच्याकडे जा काहीतरी वाचन आणि मनन चाललेले असेल आणि त्याचा प्रसाद

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ताबडतोब मिळेल. "का हो, कबीर काय लिहितो, अगदी अप्रतीम!" अ. नां. च्या लेखी सारेच संत अप्रतीम आहेत. ज्ञानदेव, एकनाथ आणि तुकोबा तर सोडाच; पण नामदेव, जनाबाई, सेना न्हावी, गोरा कुंभार सारेच अप्रतीम! तसेच बुद्ध, ख्रिस्त, रसेल, व्हाईटहेड, लॅओध्स युटांग, आईन्स्टीन! निरागस जिज्ञासा आणि निर्मळ कुतूहलानं विश्वाकडे पाहणाऱ्याला सारेच अप्रतीम दिसते. कुरूप–सुरूप, मंगल–अमंगलाचे भेदाभेद मावळतात. त्यांच्या त्या वऱ्हांड्यात लाकडी पलंगावर बसून त्यांनी किती संतांची किती वचनामृते मारलेल्या वाणीने मला (आणि पुराणिकांना) ऐकवली असतील त्याचा हिशेब नाही. येशू ख्रिस्तही त्यांना तितकाच जवळचा. तुकोबाच्या जोडीला ख्रिस्ताची तसबीर त्यांच्या घरी पाहून अनेकांना त्यांचा राग येतो, कुठे तरी विटाळल्यासारखे वाटते. काही वर्षांपूर्वी त्यांना श्री. जे. कृष्णमूर्तींचा शोध लागला आणि एका सायंकाळी त्यांनी मला "तुम्ही जे. कृष्णमूर्ती वाचला का? जरूर वाचा, अगदी अप्रतीम"––म्हणून एका आधुनिक संताची ओळख करून दिली, पुस्तके दिलीत आणि जी पुस्तके इथे मिळणार नाहीत त्यांचा मुंबईचा पत्ता दिला. "जे. कृष्णमूर्ती आणि ज्ञानेश्वरांचे अमृतानुभव" या विषयावर त्यांनी मागे एक लेख लिहिला आणि अनेक विद्वानांचा रोष स्वतःवर ओढवून घेतला. त्यानंतर एका संध्याकाळी त्यांच्या घरी गेलो असताना मीच त्या रोषाचा उल्लेख केला; तेव्हा ते म्हणाले, "अहो, खरोखरीच अमृतानुभव आणि जे. कृष्णमूर्ती यांच्यात काडीचाही फरक नाही, पण लोक संतापले बोवा माझ्यावर, कठिण आहे नाही?"

ऐहिक जीवन नेटकेपणाने जगण्याचा प्रयत्न करणारे पण आतून कुठेतरी एका प्रचंड अशा जिज्ञासेने मारावून गेलेले, प्राध्यापक म्हणून जीवन कंठणारे पण आतून पंढरीच्या वारीतले एक वारकरी म्हणून संत मेळाव्याच्या मागून टाळ घेऊन तळमळीने चालणारे, 'व्हिएतनाम'पासून तो वाढत्या महागाईबद्दल बोलणारे पण आतून 'ही सगळी गंमत अशीच चालायची' अशी जाणीव असलेले अ. ना. हेही माणूस असले तरी कुठेतरी आत अप्रतीम आहेत. त्यांनी ज्या संतमंडळींची आणि दार्शनिकांची ओळख माझ्यासारख्या सामान्य विद्यार्थ्याला करून दिली त्याबद्दलचे त्यांचे ऋण कधीच फेडता येणार नाही. प्रवचनकाराच्या शैलीने होणारी त्यांची व्याख्याने माझ्यासारख्या सामान्य माणसाला फार आवडतात आणि बहुधा मी ती ऐकतोच.

"काय वहिनीबाई, आहेत का सर?" म्हणून आम्ही विचारावे आणि "किती माणसं घरी येतात बाई सारखी!" असा विचार कधीही मनात न आणता हसत मुखाने सौ. देशपांडे यांनी आमचे सदैव स्वागत करावे, यामुळे अ. नां. चे घर अनेकांना फार जवळचे वाटते. कुठलीही उदासवाणी सायंकाळ अ. नां. च्या घरी गेल्याने उजळून निघते असा माझा अनुभव आहे. परमेश्वराने अ. नां. ना आणि त्यांच्या कुटुंबाला उदंड समाधान द्यावे हीच त्याच्या चरणी प्रार्थना.

पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ व इतर वाङमय
वाचनालयाच्या पद्धतीवर वाचावयास
मिळतील. संपर्क साधा —

डेनेट आणि कंपनी
पुस्तकविक्रेते, प्रकाशक व स्टेशनर्स
महात्मा गांधी रोड, सितावर्डी, नागपूर.
दूरध्वनी क्र. २३७२८.

कुमारांसाठी अभिनव मासिक
'विद्यालंकार'
संपादक म. ल. मानकर
कार्यकारी संपादक दिनकर देशपांडे
वा. वर्गणी ६ रु. किरकोळ अंक ५० पैसे
साहित्य पाठवा. वर्गणीदार व्हा.
अशोक प्रकाशन, महाल, नागपूर.
फो. नं. २२५०४

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

डॉ. अ. ना. देशपांडे काटोल मुक्कामी या मे महिन्यात भरणाऱ्या विदर्भ साहित्य संघाच्या २६ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष निवडून आले आहेत याबद्दल त्यांचे सहर्ष अभिनंदन ! विदर्भातील देशपांडे मंडळींची साहित्यिक कामगिरी अत्यंत वैशिष्टचपूर्ण आणि भरीव अशी आहे. आध्यात्मिक विचारसरणीचा वारसा या देशपांडे मंडळींना कसा आणि कुठून मिळाला असेल हा एक संशोधनाचा विषय व्हावा. पण त्या परंपरेत डॉ. अ. ना. देशपांडयांनी आपल्या विद्वत्तेने आणि व्यासंगाने एक अनन्य स्थान प्राप्त करून घेतले आहे. पश्चिम नागपूरच्या सांस्कृतिक जीवनाला त्यांच्या ज्ञानेश्वरीवरील प्रवचनांनी उजाळा प्राप्त करून दिला आहे. त्यांच्या व्यासंगी, अभ्यासू, निरलस वृत्तीची साक्ष "आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास" या ग्रंथावरून पटेल. त्याचप्रमाणे एक निरहंकारी साहित्यिक आणि समीक्षक या दृष्टीने त्यांचे काहीसे अलिप्त तरी बुद्धया बाजूस न राहणारे व्यक्तिमत्वही लक्षणीय आहे. काटोल शाखेने त्यांची संमेलनाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली ह्याबद्दल तेथील शाखेच्या पदाधिकाऱ्यांचेही अभिनंदन करणे आवश्यक आहे.

× × ×

प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित यांना दि. २८ एप्रिल १९६६ ला ६० वर्षे पूर्ण झाली. एकसष्टीला पोचणाऱ्या साहित्यकांची संख्या वाढती आहे. त्यामुळे १९०० ते १९०५ कालखंडाला साहित्य निर्मिती करणाऱ्यांचा जन्म खंड म्हणावे की काय असे वाटू लागले आहे. एक मर्मज्ञ समालोचक आणि कवी ह्या नात्याने त्यांची कामगिरी महनीय आहे. प्रा. पंडित म्हणजे साहित्यविषयक माहितीचे भांडार. एक फटकळ, पण साधा, अत्यंत निगर्वी तरीपण निग्रही असा पंडितांसारखा साहित्यिक विरळा.

साहित्याच्या क्षेत्रात ज्यांना 'वाट पुसावी' लागते असे जे मान्यवर साहित्यिक आहेत, त्यात प्रा. भवानीशंकर पंडितांची गणना असावी, असे मला वाटते.

आम्ही प्रा. पंडितांचे याप्रसंगी हार्दिक अभिनंदन करतो आणि आयुरारोग्य चिंतितो.

× × ×

'युगवाणी'चा आकार सारखा बदलत असतो. भिन्नरुचिर्हि लोक: ! तेव्हा जुन्या आकारापैकी एक आकार युगवाणीने नव्याने धारण केला आहे. कमी पृष्ठ-संख्येमध्ये जास्त मजकूर देता यावा अशी त्यामुळे सोय होऊ शकते. त्यासाठी युगवाणीला जास्त मजकूर मिळवावा लागेल आणि 'तो' सर्वस्वी विदर्भातील नामवंत साहित्यिकांना आवाहन करतो आहे. तूर्त एवढेच.

मागल्या वर्षीचा युगवाणीचा संपादक मंडळाचा वैशिष्टचपूर्ण उपक्रम 'साहित्य गोष्ठी'चा होय. श्रीकान्त राय यांच्या प्रेरणेने हा उपक्रम मागील वर्षी चालू झाला खरा. पण सर्वश्री प्रभाकर सिरास, प्रभाकर पुराणिक, कृष्णा चौधरी, सौ. कुंदा पारसनीस आणि मेजर भट ह्यांनी ह्या पाक्षिक कार्यक्रमाचे लेकरू चांगले सांभाळले. ते यावर्षी बाळसे धरील अशी आशा करू या. मराठीच्या प्राध्यापकांनी हा कार्यक्रम राबवून घ्यावा, अशी माझी त्यांस आग्रहाची आणि कळकळीची विनंती आहे. असला कार्यक्रम अभिजात कलावंतांची निर्मिती करू शकणार नाही; ते त्याचे ईप्सितही नाही. पण अभिजात रसिक निर्माण करण्याची क्षमता असल्या कार्यक्रमात असते. साहित्य संस्था प्रत्यक्ष

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यनिर्मितीला कितपत उपकारक होतात हा प्रश्नच आहे. पण अप्रत्यक्षरीत्या साहित्यनिर्मितीला त्यांचा हातभार लागतो एवढे तरी धरून चालावे असा विचार व्यक्त करणे शिष्टपणाचे आहे काय ही गोष्ट मात्र मला इथे खटकते आहे.

× × ×

आजवर हौसेने युगवाणीला ज्यांनी लेखनसाह्य केले त्यांची युगवाणी सदैव उतराई राहील. ह्या वर्षापासून लेखकांना फूल ना फुलाची पाकळी मोबदला द्यावा असा विचार आहे. महाराष्ट्र राज्याच्या साहित्य आणि संस्कृती मंडळाने युगवाणीसाठी अनुदान मंजूर केल्यामुळे हे शक्य होणार आहे. युगवाणी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची आभारी आहे.

× × ×

अनेक वर्षांनंतर श्री. रघुनाथ दत्तात्रय सरंजामे यांचे लेखन या अंकात वाचावयास मिळेल. डॉ. बाळासाहेब पुरोहितांना ज्या प्रबंधामुळे संगीतात डॉक्टोरेट मिळाली तो प्रबंध, युगवाणीत क्रमशः देण्याचा विचार आहे. 'संगीतातील परंपरा आणि घराणी' हा विषय जाणकारांबरोबर आपल्या-सारख्या सामान्य वाचकांनासुद्धा रुचावा.

ह्या अंकाचा आणखी एक विशेष म्हणजे एका प्रसिद्धीपराङ्मुख कवीची कविता आणि तिचा परामर्श ! श्री. उ. रा. गिरी अनेक वर्षांपासून कविता लिहीत आहेत. त्यांच्या कवितांकडे रसिकांचे लक्ष जाणे अपरिहार्य आहे, इतकी उत्तम कविता त्यांनी लिहिली आहे.

मागल्या अंकापासून आणखी एक सदर सुरू करण्यात आले आहे. ते म्हणजे "आवड–निवड." त्याबद्दल आपली 'आवडनिवड' कळवावी.

संपादक

स्वभाव-वैशिष्ट्य

टिळक व रानडे

ज्या कालखंडात, या दोघा थोर पुरुषांनी निर्भयपणे देशसेवा केली, त्या काळात ब्रिटिश सरकारच्या राजवटीवर साधकबाधक टीका केलेलीही सरकारला खपत नसे. टिळकांचा पिंड कणखर होता. झोपी गेलेल्या प्रजेला जागे करून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सर्वत्याग करण्यास त्यांनी जनतेला उद्युक्त केले. रानड्यांचा पिंड कोमल होता. त्यातून सरकारी नोकरीत असल्यामुळे, बहुजनसमाजाला सोसाव्या लागणाऱ्या अन्यायाविषयी लिहताना, आपली बंधने संभाळून रानडे लिहीत असत. त्यामुळे उघडपणे त्यांच्यावर शस्त्र उपसणे सरकारला साधले नाही. टिळकांच्या लिखाणाला व भाषणाला मराठा–समशेरीची धार होती. त्यामुळे त्यांना अनेक वेळ कारावास सोसावा लागला.

राजकारणाच्या धकाधकीत उभयपक्षाच्या मार्गदर्शनात विरोधाभास उत्पन्न होऊन जहाल–मवाळ असे तट पडले. जणू काय, टिळक व रानडे हे व्यक्तिशः एकमेकांचे वैरी आहेत असा संभ्रम निर्माण झाला.

वस्तुस्थिती अर्थात तशी नव्हती. याचे प्रत्यंतर, रानडे वारले तेव्हा प्रत्ययास आले. रानड्यांविषयीच्या मृत्युलेखात टिळकांनी असे लिहिले की—

"कर्तृत्वशून्य समाजात चैतन्य निर्माण करून देशोन्नतीचा भगवा झेंडा हाती घेऊन आघाडी सांभाळण्याचा मान रानड्यांनाच दिला पाहिजे."

र. द. सरंजामे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ यांजकडून

कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांचा सत्कार

रविवार दि. १० एप्रिल १९६६ रोजी सायं. ६–३० वाजता नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांचा सत्कार म. म. दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला.

यावेळी प्रा. रा. श्री. जोग, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, डॉ. म. गो. बोकरे अणि प्रा. वा. कृ. चोरघडे यांची भाषणे झाली.

संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांचा सत्कार

मे महिन्यात काटोल येथे भरणाऱ्या २६ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांचा गुरुवार दि. २८ एप्रिल ६६ रोजी सायं. ६–३० वा. सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. मा. गो. देशमुख, श्री. आ. रा. देशपांडे, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे, प्रा. श्री. मा. कुळकर्णी आणि श्री. बाळ पांडे यांची भाषणे झाली.

श्रीगणेश व्याख्यानमाला

दरवर्षीप्रमाणे यंदा दि. २३, २४, २५ एप्रिल ६६ रोजी सायं. ६–३० वाजता श्रीगणेश-व्याख्यानमालेचे ७ वे पुष्प श्री. अप्रबुद्ध (विष्णु केशव ऊर्फ अण्णासाहेब पाळेकर) यांनी गुंफले.

यावेळी 'वैदिक धर्माचा खरा इतिहास', विद्यमान स्थिति, अपसिद्धान्त व वास्तविक स्वरूप या विषयावर व्याख्याने झाली. या व्याख्यानमालेचा समारोप श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांनी केला.

वि. सा. संघ कार्यकारी मंडळाची सभा दि. ३ एप्रिल ६६ रोजी झाली. या सभेत १ वर्षा-साठी समित्या—उपसमित्यांचे आमंत्रक आणि सभासद निवडण्यात आले.

परीक्षा समिती

परीक्षा समिती—संचालक—श्री. ग. स. देशपांडे, सभासद—श्री. प्रभाकर चाफेकर, प्रा. रू. पां. पाजणकर, श्री. भा. य. लांबे, प्रा. ग. वा. करंदीकर, प्रा. रा. ब. सूर्यकर, सौ. पुष्पलता सहस्रबुद्धे, प्रा. सौ. उषा लिमये.

'युगवाणी' संपादक मंडळ—संपादक—श्री. मा. नी. गलगलीकर, सभासद—श्री. बाळा-साहेब ढवळे, श्री. व्यं. नी. पंडित, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे, सा. भू. तु. ना. काटकर, प्रा. पुंडरीक घुमाळे, श्री. श्रीकान्त राय.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सांस्कृतिक समिती—आमंत्रक : श्री. वा. गो. चोरघडे, सहआमंत्रक—श्री. वा. के. अत्रे; सभासद—श्री. मनोहर खोलकुटे, श्री. प्रभाकर चाफेकर, श्री. न. दि. घारपुरे, डॉ. वा. न. वानकर, श्री. च. शं. कुळकर्णी, श्री. के. ए. पोतदार, कु. दुर्गा कानगो, प्रा. लीला हजरनवीस.

नाट्य समिती—आमंत्रक—पु. व्यं. दारव्हेकर, सभासद—श्री. वसंतराव वरखेडकर, श्री. नागेश देशमुख, श्री. दिनकर देशपांडे, श्री. प्रभाकर गडकरी, प्रा. वि. ए. तारे, श्री. सुधाकर खांडवे, प्रा. म. ना. लोही, श्री. प्रभाकर पुराणिक, सौ. शकुंतलाबाई खोत.

प्रकाशन समिती—आमंत्रक-डॉ. वि. भि. कोलते, सभासद-प्रा. डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, प्रा. भ. श्री. पंडित.

चित्रशाला समिती—आमंत्रक-श्री. डी. के. मनोहर, सभासद-श्री. मधुकरराव पारळकर, श्री. भांजीभाई पाटणकर, श्रीपाद चोरघडे, श्री. वसंत इंगळे.

गडकरी स्मारक समिती—सभासद-श्री. रा. सी. खोलकुटे, श्री. पां. वा. गडकरी, कु. ताराबाई प्रधान.

ग्रंथालय समिती—आमंत्रक-श्री. वा. के. अत्रे, सभासद-श्री. गोपाळराव पाठक, श्री. न. दि. घारपुरे, श्री. ग. नी. मवाळकर, श्री. पां. श्री. फडके, श्री. अशोक बुटी, श्री. च. शं. कुळकर्णी, श्री. अ. ल. लिमये, श्री. कमलाकर मासोदकर, श्री. गोपाळ कौशिक.

अर्थ समिती—आमंत्रक-कोषाध्यक्ष सौ. सरलाबाई भावे, सभासद-श्री. गोपाळराव पाठक, डॉ. म. गो. बोकरे, श्री. आनंद जोग, श्री. वा. गो. चोरघडे, डॉ. म. अ. चान्सरकर, श्री. मनोहर खोलकुटे.

प्रसिद्धी समिती—आमंत्रक-श्री. के. ए. पोतदार, सभासद-श्री. मधुकरराव डांग्रे, श्री. श्याम सरवटे, श्री. प्रभाकर पुराणिक.

कार्यक्रम व्यवस्था समिती—आमंत्रक-श्री. चंद्रकांत देव, सहआमंत्रक-श्री. मधुकर अलोणी, सभासद-श्री. शरद पाठक, श्री. मधुकर टेकाडे, श्री. शरद देशपांडे, श्री. प्रभाकर गडकरी, श्री. आनंद जोग, श्री. मधुकर राजे.

अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, सरचिटणीस आणि नागपूरचे चिटणीस सर्व समित्यांवर पदसिद्ध सभासद राहतील.

विदर्भ साहित्य संघाचे नवे प्रकाशन

लोकसाहित्य संपदा

लेखक व संपादक : **ना. रा. शेंडे**

विदर्भातील लोकगीतांचे व लोककथांचे संकलन व संपादन.
रसिकांना व अभ्यासकांनाहि सारखाच संग्राह्य.

पृ. ३३६+८ डेमी] [मूल्य ६ रु.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

सभासदांना नम्र विनंती

स. न. वि. वि.

वि. सा. संघाचे नर्वे न वर्ष १ एप्रिल ६६ पासून सुरू झाले असून चालू वर्षाची साधारण सभासदत्वाची वार्षिक वर्गणी रु. ३ आहे.

वि. सा. संघाचे सभासद होणारांनां इ. स. ६६–६७ ची वर्गणी रु. ३ भरल्यावर त्याच्या पुढील महिन्यापासून 'युगवाणी' मासिक विनामूल्य पाठविण्यात येते. तरी दि. १५-५-६६ पर्यंत वर्गणी पाठवून सभासद व्हावे, ही विनंती.

दि. १ मे १९६६

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस
वि. सा. संघ, नागपूर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र-दिनी महन्मंगल महाराष्ट्राला मानाचा मुजरा—

मराठी मन आणि मराठी मातीची

मराठी माणसाने वाचावी, ऐकावी अशी

कूजिते आणि गर्जिते

पृष्ठें : ७५ मूल्य : रु. १-२५

उद्‌गाता : शिरीष

वितरक गोकुळ मासिक प्रकाशन, ११९४ सदाशिवपेठ, पुणे

नागपुरातील प्राप्तिस्थळ साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर.

Dances By Experts You Have Seen Many—
But The Like WAHEEDA REHMAN Was Never Any !
It Is In "GUIDE" In Technicolour In PANCHSHEEL—
Once You See You Will Repeat Till Satisfied You Feel !!

Navketan International's

GUIDE

★ Dev Anand ★ Waheeda Rehman ★ Kishor Sahu

पंचशील मध्ये—धमाल गर्दीत सुरू आहे

कल्याण चित्रचर्या प्रा. लि. अमरावती प्रकाशन

मुद्रक : वा. ना. कन्हट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १.
प्रकाशक : मा. गो. गळगळीकर, विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १.

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका